१९३७-२०२६ ९० वर्ष
# कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
रायगड सोमवार । दि. २२ जून २०२६ । अंक १६ । पृष्ठे ८ । किंमत ४ ₹ । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## वायूगळतीमुळे सात महिलांचा मृत्यू

**तामिळनाडू :** तिरुवल्लूर जिल्ह्यातील एका सी-फूड कारखान्यात अमोनिया वायूची गळती होऊन सात महिलांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवारी घडली. या दुर्घटनेत ६० हून अधिक कामगार बाधित झाले असून, त्यांच्यावर विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. वायू गळतीनंतर कामगारांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार, एकूण ६७ जणांवर उपचार सुरू असून, त्यापैकी नऊ जणांची प्रकृती गंभीर आहे.

## एसटी महामंडळ संकटात

**मुंबई :** राज्य परिवहन (एसटी) महामंडळ गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत असून, राज्य सरकारकडून तातडीची आर्थिक मदत न मिळाल्यास पुढील महिन्यात कर्मचाऱ्यांचे वेतन देणे कठीण होणार असल्याची माहिती महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने दिली आहे. महामंडळावर इंधन, दुरुस्ती, सुटे भाग, पथकर तसेच भाडेतत्त्वावरील बसची देणी थकीत आहेत. याशिवाय कर्मचाऱ्यांचा पीएफ, ग्रॅज्युइटी, वैद्यकीय व प्रवास भत्ते यांसह विविध देणीही प्रलंबित आहेत. डिसेंबर २०२५ ते मे २०२६ या कालावधीत कर्मचाऱ्यांची तब्बल ६३३ कोटी २ लाख रुपये देणी थकीत आहेत.

**वे|धा|क**

## भरधाव डंपरच्या धडकेत तरुण ठार



**चणेरा :** रोहा-नागोठणे मार्गावरील भिसे खिंडीत भरधाव डंपरच्या धडकेत २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. याप्रकरणी डंपर चालकाविरोधात रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राज गणेश पतंगे (२२, रा. अष्टमी कोळीवाडा) हा २० जून रोजी रात्री सुमारे १०.१० वाजता केटीएम मोटारसायकलवरून नागोठणेहून रोहाकडे येत असताना भिसे खिंडीत समोरून येणाऱ्या डंपरने त्याच्या दुचाकीला पान २ वर

## आजपासून पावसाळी अधिवेशन

**मुंबई :** राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सोमवार, दि. २२ जूनपासून सुरू होत असून, अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महाविकास आघाडीने सरकारच्या चहापान कार्यक्रमावर बहिष्कार टाकत आक्रमक भूमिका घेतली आहे. महाविकास आघाडीची पत्रकार परिषद रविवार, दि. २१ जून रोजी पार पडली. या पत्रकार परिषदेत शिवसेना (ठाकरे गट) नेते भास्कर जाधव, अंबादास दानवे आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे जयंत पाटील उपस्थित होते. यावेळी विरोधकांनी एल-निनोमुळे निर्माण होणारी दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांचे प्रश्न, लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी कपात तसेच अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीवरून सरकारला घेरण्याचा इशारा दिला.

## सिडको कार्यालयातून संचिका चोरीला

**चिरनेर :** सिडको कार्यालयातील के-६६ ही महत्त्वाची संचिका चोरीला गेल्याप्रकरणी राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ, नवी मुंबई यांनी सीबीडी पोलिसांना आरोपीचा शोध घेण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, दोन महिने उलटूनही संबंधित आरोपीचा शोध लागलेला नसल्याने अरुण मुंबईकर यांनी नाराजी व्यक्त केली आहे. मुंबईकर यांच्या पत्नी कमल अरुण मुंबईकर यांचे वडील कै. बाळकृष्ण काळू भोईर यांच्या साडेबारा टक्के गावठाण विस्तार भूखंड योजनेशी संबंधित ही संचिका असल्याचे सांगण्यात आले आहे. राज्य माहिती आयोगाच्या १५ एप्रिल २०२६ च्या आदेशानंतर सीबीडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पान २ वर

### अस्तित्वात नसलेल्या समितीच्या नावे काढली लाखोंची बिले?

# चिंचोटीत ‘जल’प्रताप

- जलजीवन योजनेत गैरव्यवहाराचा आरोप
- सरपंच, ग्रामसेवक, ठेकेदार, पाणीपुरवठा अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करा
- ॲड. राकेश पाटील यांचा एसपी, सीईओंकडे तक्रार अर्ज
- योजना अपूर्ण, पण कागदोपत्री पूर्ण?
- पाणी नाही, तरी ‘हर घर जल’; लाभ नाही, तरी ३४९ लाभार्थी?




**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

चिंचोटी गावात अस्तित्वात नसलेल्या ‘ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती’च्या नावाने कागदोपत्री योजना पूर्ण दाखवून, संयुक्त प्रमाणपत्रे, नाहरकत दाखले आणि ‘हर घर जल’ प्रमाणपत्राच्या आधारे शासनाच्या ७६,१६,३४५/- रुपयांच्या निधीची बिले काढण्यात आल्याचा धक्कादायक आरोप समोर आला आहे. विशेष म्हणजे, ज्या समितीच्या नावाने संपूर्ण कागदोपत्री कारभार झाल्याचा दावा केला जात आहे, ती समितीच अस्तित्वात नसल्याचे ग्रामपंचायतीच्या लेखी उत्तरातून समोर आल्याचा दावा तक्रारदार सामाजिक कार्यकर्ते ॲड. राकेश पाटील यांनी केला आहे. याप्रकरणी तत्कालीन सरपंच, ग्रामसेवक, ठेकेदार, कार्यकारी अभियंता आणि उपअभियंता यांच्याविरोधात ॲड. पाटील यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल व मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्याकडे तक्रार दाखल करून गुन्हा नोंदविण्याची मागणी केली आहे. पान २ वर

### ७६,१६,३४५/- लाख रुपयांच्या निधीचा अपहार?

ॲड. राकेश नारायण पाटील यांनी रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक आंचल दलाल तसेच रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्याकडे सविस्तर तक्रार अर्ज दाखल केला आहे. तक्रारीनुसार अस्तित्वात नसलेल्या चिंचोटी ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे अस्तित्व कागदोपत्री दाखवून शासनाची फसवणूक करण्यात आली असून शासनाच्या ₹७६,१६,३४५/- (शहात्तर लाख सोळा हजार तीनशे पंचेचाळीस रुपये) निधीचा अपहार व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात तत्कालीन सरपंच बिंदिता पान २ वर

### निहाल चवरकरांच्या प्रमाणपत्रावर प्रश्नचिन्ह

रायगड जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता निहाल चवरकर यांनी चिंचोटी गावासाठी ‘‘हर घर जल’’ गाव प्रमाणपत्र देताना ग्रामपंचायत, कथित ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती तसेच लाभार्थी नोंदींची पडताळणी केली नाही. या प्रमाणपत्रात सर्व कुटुंबांना वैयक्तिक नळजोडणी देण्यात आल्याचे, वितरण वाहिन्यांमध्ये कुठेही गळती नसल्याचे, सरपंच व ग्राम पाणी व स्वच्छता समिती सदस्यांसह गाव पाहणी झाल्याचे, ग्रामस्थांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचे फायदे समजावून सांगितल्याचे सर्व लाभार्थ्यांची नावे पोर्टलवर अपलोड करण्यात आल्याचे दाखविण्यात आले आहे. मात्र, प्रत्यक्ष परिस्थिती याच्या उलट असल्याचा दावा करत ॲड. राकेश पाटील यांनी करीत निहाल चवरकर यांनी पदाचा गैरवापर करून शासनाची दिशाभूल करणारे प्रमाणपत्र दिल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे शासनाची फसवणूक होऊन लाखो रुपयांची बिले मंजूर होण्यास मदत झाल्याचा आरोप तक्रार अर्जात करण्यात आला आहे.

> “चिंचोटी ग्रामपंचायतीतील जलजीवन मिशन प्रकरण हा केवळ एक नमुना आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ज्या-ज्या ठिकाणी जलजीवन मिशनच्या योजना राबविण्यात आल्या आहेत, त्या अनेक गावांमध्ये बिले काढूनही नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. ग्रामीण भागातील महिलांना आजही पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. कागदोपत्री ‘हर घर जल’ आणि प्रत्यक्षात पाण्यासाठी वणवण अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल आणि मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा आहे.”
>
> – ॲड. राकेश नारायण पाटील, तक्रारदार

## आक्षीतील अंतर्गत रस्त्याचा शुभारंभ

### चित्रलेखा पाटील यांचा पुढाकार



**। अलिबाग । शहर प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील आक्षी ग्रामपंचायत हद्दीत शेकापच्या माध्यमातून अनेक विकासकामे करण्यात आली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आक्षी-खारगल्ली या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ रविवारी करण्यात आला. याआधी या रस्त्याचा भूमीपूजन सोहळा शेकाप राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते पार पडला होता. या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून होत आहे. त्यामुळे स्थानिकांमधून शेकापचे आभार मानले जात आहेत.

अलिबाग तालुक्यातील आक्षी ग्रामपंचायत हद्दीत शेकाप सरचिटणीस जयंत पाटील आणि राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पान २ वर

## बापाच्या नात्याला काळीमा

- पोटच्या मुलीवर दहा वर्षे लैंगिक अत्याचार
- नराधम बाप गजाआड

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पोटच्या १६ वर्षांच्या निष्पाप मुलीवर तब्बल दहा वर्षे सातत्याने लैंगिक अत्याचार करणाऱ्या ५५ वर्षीय नराधम पित्याला खांदेश्वर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. नवीन पनवेल परिसरात घडलेल्या या अत्यंत संतापजनक आणि माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटनेमुळे संपूर्ण परिसरात प्रचंड संताप व्यक्त करण्यात येत आहे.

या घटनेतील पीडित मुलगी २०१६ मध्ये केवळ सात वर्षांची असल्यापासून छळ सुरु होता. आरोपी घरात पीडितेच्या आईच्या अनुपस्थितीत अथवा रात्रीच्या वेळी तिला वेगवेगळ्या प्रकारे त्रास देत होता. आई घरात नसताना पीडितेच्या इच्छेविरुध्द जबरदस्तीने अश्लील आणि घृणास्पद कृत्य करण्यास तिला भाग पाडत होता. विरोध केल्यास तिला बेदम मारहाण आणि जीवे मारण्याच्या धमक्या होता. घाबरुन पीडित मुलीने सदर कृत्याची माहिती कुणालाही दिली नाही. सन २०२४ मध्ये जेव्हा पीडित मुलगी १४ वर्षांची झाली, तेव्हाही या नराधम बापाची क्रूरता थांबली नाही. घरात कोणीही नसताना नराधम बापाने तिला वारंवार मारहाण करुन, जबरदस्तीने तिच्यावर अनैसर्गिक आणि लैंगिक अत्याचार केले.

गेली दहा वर्षे पान २ वर

## अलिबाग किनाऱ्यावर सात पर्यटकांना जीवदान

### जीवरक्षक, पोलीस व दामिनी पथकाची तत्पर कामगिरी




**। रायगड । प्रतिनिधी ।**

अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर शनिवारी समुद्रातील भरतीच्या वेळी अडकलेल्या सात पर्यटकांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. जीवरक्षक, पोलीस आणि दामिनी पथकाच्या सतर्कतेमुळे संभाव्य दुर्घटना टळली असून, पर्यटकांचे प्राण वाचविण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, समुद्रकिनाऱ्यावर फिरण्यासाठी आलेले काही पर्यटक भरतीच्या वाढत्या पाण्यात अडकले होते. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येताच जीवरक्षक आणि पोलीस यंत्रणा तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. समन्वयाने करण्यात आलेल्या बचावकार्यात सर्व पर्यटकांना सुरक्षितपणे किनाऱ्यावर आणण्यात आले.

या बचाव मोहिमेत पर्यटक नूर मोहम्मद परवेझ मेमन, रायन उनोस मेमन, अकीफ शेख, नदीम शेख आणि गफ्फार बुबेरे यांच्यासह एकूण सात जणांना वाचविण्यात यश आले आहे.

बचाव कार्यात जीवरक्षक कुणाल सारंग आणि प्रथमेश सारंग यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच बीट मार्शल पोलीस शिपाई कणसे आणि शिंदे, दामिनी पथकातील कर्मचारी, महिला पोलीस शिपाई घवाळे, तसेच होमगार्ड सिद्धेश नाईक आणि अमरनाथ पाल यांनी धाडस व तत्परता दाखवत बचावकार्य यशस्वी केले.

## उलवे लॉज कनेक्शन पेणपर्यंत

- आजी-माजी नगरसेवक पोलिसांच्या ताब्यात
- महिला दलालाविरुद्ध गुन्हा दाखल
- ३६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त



**। उलवे । प्रतिनिधी ।**

उलवे परिसरातील एका लॉजवर पोलिसांनी धडक कारवाई करत कथित अनैतिक व्यवसायाचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी एका महिला दलालाविरुद्ध विविध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपासाचे धागेदोरे थेट पेण शहरापर्यंत पोहोचल्याने प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. पीडित अल्पवयीन मुलीच्या जबाबानंतर पेणमधील माजी नगरसेवक कुणाल नाईक तसेच विद्यमान नगरसेवक उपेंद्र कोलाडकर, अच्युत पाटील आणि प्रमोद पाटील यांना उलवे पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे.

याबाबत उलवे पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार अजिंक्य सुभाष गोसावी यांच्या फिर्यादीवरून गुन्हा रजिस्टर क्रमांक ११९/२०२६ दाखल करण्यात आला आहे. आरोपी सारिका (वय ३३, रा. सीबीडी बेलापूर) हिच्याविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३, अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, पॉक्सो कायदा तसेच बाल न्याय अधिनियमांतर्गत गंभीर स्वरूपाचे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ जून रोजी सायंकाळी उलवे सेक्टर-१९ येथील ‘ला रेसिडेन्सी लॉज’च्या रूम क्रमांक २०२ मध्ये ही कारवाई करण्यात आली. प्राथमिक तपासात आरोपी महिलेने दोन अल्पवयीन मुली अल्पवयीन असल्याची माहिती असूनही त्यांना ग्राहकांसोबत शारीरिक संबंध ठेवण्यासाठी प्रवृत्त केल्याचे समोर आले आहे. तसेच या माध्यमातून आर्थिक लाभ मिळवून स्वतःचा उदरनिर्वाह केल्याचा आरोप तिच्यावर ठेवण्यात आला आहे.

कारवाईदरम्यान पोलिसांनी ३६,१०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, त्यामध्ये रोकड रक्कम, बनावट चलनी नोटा तसेच विविध कंपन्यांचे मोबाईल फोन यांचा समावेश आहे. दरम्यान, पीडित अल्पवयीन मुलींकडून माहिती घेत असताना एका पान २ वर

**नेहुली येथे योग दिनाचे आयोजन | जिल्हाधिकारी किशन जावळेंचे प्रतिपादन**

## निरोगी, आनंदी राहण्यासाठी योग महत्त्वाचे

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

प्रत्येकाने निरोगी आणि आनंदी राहण्यासाठी आपल्या जीवनात योग करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी रविवारी केले. जिल्हा प्रशासन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल, नेहुली येथील प्रशस्त बॅडमिंटन हॉल येथे आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.


(छायाचित्र : समीर मालोदे)

यावेळी रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, ॲड. निहा राऊत, तालुका क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनूर, क्रीडा अधिकारी सुचिता ढमाले, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तथा प्रिझम संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी नंदकुमार गोंधळी, स्वयंसिद्धा संस्थेच्या अध्यक्षा सुचिता साळवी, क्रीडा विभागाचे आकाश डोंगरे, श्री अंबिका योग कुटीरचे संस्थापक विरेंद्र पवार या संस्थेचे प्रशिक्षक तसेच प्रिझम सामाजिक विकास संस्थेचे स्वयंसेवक, पी.एन.पी. शाळेचे विद्यार्थी व शिक्षक वृंद, स्पर्धा विश्व अकॅडमीचे प्रशिक्षणार्थी, सरकारी अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले की, आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्र महासभेत भाषण करताना संपूर्ण जगाला योगाचे महत्त्व पटवून दिले. संयुक्त राष्ट्र महासभेने अधिकृतपणे २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केला. अप्राप्त वस्तू प्राप्त होणे याला योग म्हणतात. प्राणायाम ध्यान आसने यातून मानसिक एकाग्रता वाढते. यातून आपल्याला जे साध्य पान २ वर

## रोहा तालुक्यात पावसाची हजेरी

**। रोहा । प्रतिनिधी ।**

शहर व ग्रामीण भागात रविवारी दुपारी पावसाने दमदार हजेरी लावली. गेल्या काही दिवसांपासून उकाड्याने हैराण झालेल्या रोहेकर नागरिकांना दिलासा मिळाला आहे. दरम्यान, दडी मारून बसलेल्या पावसाने आज अचानक हजेरी लावल्याने बच्चे कंपनीने पावसात भिजत मनमुराद आनंद लुटल्याचे चित्र पाहायला मिळत होते. उष्णतेमुळे दिलासा देणाऱ्या या पावसामुळे लहान मुलांसह नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. मान्सून बरसल्याने शेतकरी वर्गातही समाधान व्यक्त करण्यात येत असून, आगामी पेरणीच्या तयारीला वेग येण्याची शक्यता आहे.

## जिल्ह्यात ३० जूनपर्यंत जलतरण तलाव बंद

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यातील उष्ण व दमट हवामान, मान्सूनच्या आगमनास झालेला विलंब, अत्यल्प पर्जन्यमान आणि जलसाठ्यात झालेली लक्षणीय घट लक्षात घेता रायगड जिल्ह्यातील सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांवर अवलंबून असलेले सर्व जलतरण तलाव (स्विमिंग पूल) दि. २० ते ३० जून या कालावधीत बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष किशन जावळे यांनी जारी केले आहेत.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून हा निर्णय घेण्यात आला आहे. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा अबाधित राखणे आणि उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने वापर सुनिश्चित करणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

भारतीय हवामान विभागाच्या २० जून २०२६ रोजीच्या अंदाजानुसार रायगड जिल्ह्यात उष्ण व दमट हवामान कायम राहण्याची शक्यता असून, दुपारनंतर अथवा सायंकाळी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसासह मेघगर्जनेची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्याला ‘यलो अलर्ट’ जारी करण्यात आला आहे. पान २ वर

# सावित्री नदीत रात्रीस खेळ

| महाड | प्रतिनिधी |

महाडमध्ये पूरस्थितीनंतर सावित्री नदीतील गाळ काढण्याच्या कामाच्या नावाखाली वाळू उपशाचा प्रकार सुरू असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत. महसूल व जलसंपदा विभाग याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याची चर्चा तालुक्यात रंगू लागली असून, तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याने संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त केला जात आहे.



प्रशासनाकडून गाळ उपशाच्या कामासाठी संबंधित ठेकेदारांना २० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या मुदतीचा फायदा घेत रात्रीच्या वेळी सावित्री नदीपात्रात वाळू उपशाचे प्रकार वाढल्याचे चित्र आहे. दरम्यान, महाड शहरातील वाळू-रेजगा तलाठी कार्यालयाच्या शेजारीच, गांधारी रोडलगत असलेल्या जागेत रात्रीच्या अंधारात नदीपात्रातून काढून ठेवलेल्या रेजग्याची (वाळूची) चाळणी केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जेसीबीच्या साहाय्याने ट्रॅक्टर-ट्रॉलीवर चाळण बसवून वाळू गाळून त्यातून चांगल्या प्रतीची वाळू वेगळी काढली जात असल्याचा प्रकार सुरू आहे. विशेष म्हणजे हा सर्व प्रकार शहराच्या हद्दीत आणि तलाठी कार्यालयाच्या जवळच सुरू असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

- **गाळ काढण्याच्या नावाखाली वाळूउपसा**
- **तलाठी कार्यालयाशेजारीच सुरू प्रकार**
- **प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

याबाबत संबंधित तलाठी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असता त्यांनी कोणतीही स्पष्ट प्रतिक्रिया देण्याचे टाळल्याचे सांगितले जाते. त्यामुळे हा प्रकार प्रशासनाच्या आशीर्वादानेच सुरू आहे का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

एकीकडे अनधिकृत उत्खनन आणि वाळू चाळणीचे प्रकार उघडपणे सुरू असल्याचे दिसत असताना, दुसरीकडे प्रशासनाची रात्रीची गस्त पथके नेमकी काय करत आहेत, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. गस्त पथके झोपेत आहेत की संबंधित अधिकारी जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहेत, अशी चर्चा आता जोर धरू लागली आहे.

सावित्री नदीपात्रातील वाळू उपसा, वाळूची चाळणी आणि त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जेसीबी, ट्रॅक्टर व ट्रॉलींवर प्रशासन कारवाई करणार का, याकडे महाडकरांचे लक्ष लागून राहिले आहे.

### नागरिकांचा संताप!

महाड शहरातील वाळू-रेजगा तलाठी कार्यालयाच्या शेजारीच रात्रीच्या वेळी वाळू चाळणीचा प्रकार सुरू असल्याचा आरोप होत आहे. प्रशासनाच्या नाकाखाली सुरू असलेल्या या प्रकाराकडे दुर्लक्ष का केले जात आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. संबंधित प्रशासनाचे आर्थिक लागेबांधे असल्याने खुलेआम वाळूउपसा सुरू असल्याची चर्चा आहे.

### गस्त पथके कुठे?

अनधिकृत उत्खनन आणि वाळू वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी रात्रीच्या गस्त पथकांची व्यवस्था असतानाही हा प्रकार सुरू असल्याने गस्त पथकांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित यंत्रणा कारवाई करणार की पुन्हा एकदा दुर्लक्ष होणार, याची उत्सुकता नागरिकांना लागली आहे.

# अंबा नदीतील रेजगा चोरी

## महसूल प्रशासनाकडून तातडीने कारवाईची मागणी

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

जांभुळपाडा येथे अंबा नदी पात्रामध्ये अज्ञात व्यक्तीने मोठ्या प्रमाणात रेजगा उत्खनन करून चोरी केली आहे. या अनधिकृत उत्खननामुळे नदी पात्रामध्ये मोठा खड्डा पडला असून नदीची धूप होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. स्थानिक नागरिकांनी याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली असून महसूल प्रशासनाने तातडीने याची दखल घेऊन दोषींविरुद्ध कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.



दरम्यान, महसूल प्रशासन, पोलीस विभाग आणि पर्यावरण नियंत्रण मंडळ यांनी संयुक्तपणे तपास करून दोषींना शिक्षा करावी. नदी पात्राचे संरक्षण करण्यासाठी स्थानिक प्रशासनाने कठोर नजर ठेवावी, तसेच भविष्यात अशा प्रकारच्या अनधिकृत उत्खननाला आळा घालण्यासाठी नियमित तपासणी व गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे.

अंबा नदीतील रेजगा चोरी हा केवळ स्थानिक गुन्हा नसून पर्यावरणीय हानीस कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे शासनाने तातडीने कारवाई करून दोषींना शिक्षा करणे आवश्यक आहे. नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करून नदीचे संरक्षण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## रुग्णवाहिकेला मार्ग मोकळा; सजग नागरिकाकडून विशेष कौतुक

| पनवेल | प्रतिनिधी |

नवीन पनवेल येथील एचडीएफसी सर्कलजवळील उड्डाणपुल परिसरात सायंकाळी सुमारे ६.५८ वाजण्याच्या सुमारास वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. यावेळी एका रुग्णवाहिकेला वाहतुकीमुळे पुढे जाता येत नसल्याचे लक्षात येताच महाराष्ट्र सुरक्षा बल कर्मचारी नितीन महांगडे (क्रमांक २५२६७७३) यांनी प्रसंगावधान राखत तात्काळ पुढाकार घेतला.

श्री. महांगडे यांनी स्वतः रस्त्यावर उतरून वाहतूक नियंत्रित करत संबंधित रुग्णवाहिकेला सुरक्षित व तात्काळ मार्ग उपलब्ध करून दिला. त्यांच्या या तत्परतेमुळे रुग्णवाहिका वेळेत पुढे जाऊ शकली.

# एनडीज् स्टुडियोतील कामगारांवर उपासमारी

## ६० वयाचे कारण देत अचानक कामावरून काढून टाकलं

| खोपोली | प्रतिनिधी |

कलादिग्दर्शक नितीन देसाईच्या निधनानंतर शासनाने दोन वर्षापुर्वी ताब्यात घेतल्यापासून कामगारांना पगार वाढ नाही,कोणतीही सुविधा नाही,कायस्वरूपी कामगारांना कोणतेही पूर्व कल्पना न देता कॉन्ट्रॅक्टमध्ये वर्ग केले आहे.बारकू तरे कामागार कामावर असताना ह्दयविकाराच्या झटका आला. रूग्णालयात घेवून जाण्यासाठी रूग्णवाहीका नसल्यामुळे दुचाकीवरून रूग्णालयात घेवून जावे लागले.रूग्णालयातात वेळेवर पोहचले नसल्यामुळे तरे यांचा दुदैवी मृत्यु झाला. बारकू तरेच्या कुटूंबाला कोणतीही आर्थिक मदत केली नसल्यामुळे कामगारांनी आक्रामक पवित्रा घेवून प्रसारमाध्यमांकडे व्यथा मांडल्याने एनडीज् आर्ट वर्ल्ड स्टुडियो प्रा.लि कंपनीच्या प्रशासनाने ६० वर्षाचा कारण देत जवळपास १४ कामगारांना काढल्याचा धक्कादायक निर्णय घेतला आहे.कंपनी प्रशासनाने अधिक वय असल्याचे सांगत मुख्य गेटवरून प्रवेश देवू नये असा परिपत्रक काढले आहे.

खालापूरातील कर्जत-चौक रस्त्यावरील एनडी स्टुडियो स्थानिक कामगार अनेक वर्षापासून काम करीत आहेत.कलादिग्दर्शक नितीन देसाई असताना कामगारांना वेळेवर पगार आणि सर्व सुविधा मिळत होत्या तसेच कामागारांचा मानसन्मान राखला जात होता मात्र राज्य शासनाने दोन वर्षापूर्वी एनडी स्टूडियो ताब्यात घेतला आहे.तेव्हापासून याठिकाणी एकही शुटींग सुरू नाही तसेच दादांबरोबर अनेक वर्ष कामगारांना ३०० रूपयात राबवितात मात्र नवीन कामगारांना ३० हजाराच्या पुढे पगार देताना टेंडर प्रोसेस लागू नाही का ? अशी प्रचंड नाराजी प्रसारमाध्यमांसमोर व्यक्त केल्याने काही कामागारांनी नोटीस बजावली आहे तर ६० वयाचे कारण देत सुरक्षा रक्षक आणि इतर कामागारांना अचानक कामावरून काढून टाकल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे.

कामगारांनी एनडीज् स्टुडियोच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या बाहेर जमून या घटने बाबत नाराजी व्यक्त केली आहे. एनडीज् स्टुडियो सुरू झाल्यापासून नितीन देसाई यांच्यासमवेत काम केल असून संपूर्ण आयुष्यभर श्रम केले आहे.सेवानिवृत्ती देताना मानसन्मान न देता तडकाफडकी कामावरुन काढून टाकणे निंदनीय आहे.शासनाने आम्हाला सेवानिवृत्ती निमित्ताने हिशोब द्यावा, अशी मागणी कामगारांनी केली आहे.

# पनवेल-सीएसएमटी एसी लोकलमध्ये धर्मांतराचा प्रयत्न

## रेल्वेत ख्रिश्चन मिशनऱ्यांकडून पत्रकबाजी

| पनवेल | प्रतिनिधी |

मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या लोकल ट्रेनमध्ये प्रवाशांना टार्गेट करत धर्मांतराचे प्रयत्न सुरू असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. पनवेल ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसदरम्यान धावणाऱ्या एका वातानुकूलित लोकल ट्रेनमध्ये ख्रिश्चन मिशनऱ्यांकडून धार्मिक प्रचार करणारी पत्रके छुप्या पद्धतीने वाटली जात असल्याचे उघडकीस आले आहे. या संदर्भातील एक व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असून, प्रवाशांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

एसी लोकलच्या डब्यामध्ये खिडकीच्या बाजूला असलेल्या पॅनेलवर एक घ्या असे लिहिलेले पाकीट चिकटवण्यात आले होते.




प्रवाशाने जेव्हा ते पत्रक काढून पाहिले, तेव्हा त्यावर ''जीवनरेखा हवी आहे का?'' असा मुख्य मथळा छापलेला होता. या पत्रकाच्या आतील मजकुरात येशू ख्रिस्त आणि ख्रिश्चन धर्माशी संबंधित धार्मिक प्रचार आणि उपदेश लिहिलेले आढळून आले असून, रेल्वे प्रवाशांना आकर्षित करून त्यांचे ब्रेनवॉश करण्याच्या उद्देशानेच ही पत्रके तिथे ठेवण्यात आली असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हा सर्व प्रकार लोकल ट्रेन खांदेश्वर रेल्वे स्थानकाजवळ असताना एका सजग प्रवाशाने आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात कैद केला, ज्याचा संदर्भ रेल्वेच्या डिजिटल इंडिकेटरवर स्पष्ट दिसतो. रेल्वेसारख्या सार्वजनिक आणि गर्दीच्या ठिकाणी अशा प्रकारे छुप्या पद्धतीने धार्मिक प्रचार आणि धर्मांतराचे प्रयत्न होत असल्यामुळे रेल्वे सुरक्षेवर आता मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### पोलीस मदत केंद्राचा लाभ सर्वांना होणार!

| पनवेल | प्रतिनिधी |

साईनगर परिसरातील नागरिकांच्या मागणीनुसार व त्यांच्या सहकार्याने आज साईनगर या ठिकाणी नवीन पोलीस मदत केंद्र स्थापित करण्यात आले आहे. त्याचा फायदा परिसरातील नागरिकांना होणार आहे व या ठिकाणी पोलीस कार्यरत राहणार आहेत, असे प्रतिपादन पोलीस उपायुक्त परिमंडळ ३ पनवेलच्या रश्मी नांदेडकर यांनी या पोलीस मदत केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी केले. सदर नवीन साईनगर पोलीस मदत केंद्राचे पोलीस उपायुक्त परिमंडळ ३ पनवेल रश्मी नांदेडकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. यावेळी वपोनि नितीन ठाकरे यांच्यासह स्थानिक नगरसेवक लतिफ शेख व इतर अधिकारी व कर्मचारी आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते.

पान १ वरून

## चिंचोटीत 'जल'प्रताप

चिंचोटी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून चिंचोटी गावामध्ये जलजीवन मिशन योजनेंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली होती. मात्र, योजनेचा कालावधी संपूनही ग्रामस्थांना नियमित पाणी मिळाले नाही. त्यामुळे ॲड. राकेश नारायण पाटील यांनी ग्रामपंचायत चिंचोटी तसेच रायगड जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडून माहिती मागविली. मिळालेल्या कागदपत्रांनुसार संबंधित योजना डिसेंबर २०२३ मध्येच पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आले आहे. प्रत्यक्षात ग्रामस्थांना पाणी मिळत नसताना योजना पूर्ण झाल्याची नोंद कशी करण्यात आली, असा प्रश्न उपस्थित करत ॲड. पाटील यांनी फेब्रुवारी २०२५ मध्ये तक्रारी दाखल केल्या. मात्र, रेवदंडा पोलिसांनी हा विषय जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील असल्याचे कारण देत तक्रार अर्जावर कोणतीही गुन्हेगारी कारवाई न करता अर्ज निकाली काढल्याचा आरोप करण्यात आला आहे.

त्यानंतर ॲड. राकेश पाटील यांनी रायगड जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडून अधिक माहिती व कागदपत्रे मिळविली. त्यामध्ये चिंचोटी गावात जलजीवन मिशन योजना राबविण्यासाठी ''ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती'' स्थापन करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. योजना पूर्ण झाल्यानंतर दुरुस्ती, देखभाल व शंभर टक्के निगा राखण्याची जबाबदारी या समितीची असल्याचे दाखविण्यात आले आहे. तसेच गावात पाणीपुरवठा सुरळीत सुरू असून, ग्रामस्थांची कोणतीही तक्रार नसल्याचे ''संयुक्त प्रमाणपत्र'' या समितीमार्फत देण्यात आल्याचे कागदपत्रांमध्ये नमूद आहे. याशिवाय ठेकेदाराने अंदाजपत्रकानुसार काम पूर्ण केले असून पाणीपुरवठा नियमित सुरू असल्यामुळे अंतिम बिलाच्या रकमेबाबत समितीची कोणतीही हरकत नसल्याचे ''नाहरकत प्रमाणपत्र''देखील जिल्हा परिषदेकडे सादर करण्यात आल्याचे समोर आले आहे.

मात्र, तक्रारदार ॲड. राकेश पाटील यांनी ग्रामपंचायतीकडे या समितीच्या अध्यक्ष, सचिव, खजिनदार व इतर पदाधिकाऱ्यांची माहिती मागितली असता ग्रामसेवक पी.डी. दिवकर यांनी लेखी पत्राद्वारे माहिती दिली की, चिंचोटी गावात जलजीवन मिशन योजनेसाठी ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती स्थापन केल्याचे दिसून येत नाही. तसेच समितीचे अध्यक्ष, सचिव, खजिनदार, पदाधिकारी यांची नावे किंवा समितीने घेतलेल्या ठरावांची माहिती उपलब्ध नसल्याचेही ग्रामपंचायतीने कळविल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. यामुळे अस्तित्वात नसलेल्या समितीच्या नावाने संयुक्त प्रमाणपत्रे, नाहरकत दाखले आणि अन्य कागदपत्रे तयार करून शासनाची फसवणूक करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

**३४९ लाभार्थी दाखविले; त्यामध्ये १८ लाभार्थी बोगस**

चिंचोटी गावामध्ये योजनेचा प्रत्यक्ष लाभ नसतानाही ३४९ लाभार्थी दाखविण्यात आले. विशेष म्हणजे, त्यापैकी १८ लाभार्थी बोगस असल्याचा आरोप ॲड. राकेश पाटील यांनी केला आहे. त्यामुळे लाभार्थी नोंदणी, पोर्टलवरील माहिती आणि प्रत्यक्ष वास्तव यामध्ये मोठी तफावत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

### ७६,१६,३४५/- लाख रुपयांच्या निधीचा अपहार?

बाबुराव पाटील ग्रामसेवक पी.डी. दिवकर, झाद इंटरप्रायझेसचे मालक साईम झुबेरखान देशमुख, रायगड जिल्हा परिषदेचे पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता वेंगुर्लेकर, पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता निहाल चवरकर यांच्याविरोधात तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी तक्रार अर्जासोबत ॲड. राकेश नारायण पाटील यांनी प्रतिज्ञापत्रही सादर केले आहे.

## सिडको कार्यालयातून संचिका चोरीला

याप्रकरणी १६ एप्रिल २०२६ रोजी सीबीडी पोलीस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल वैभव गजानन पाटील यांच्याकडे अरुण मुंबईकर यांनी जबाब नोंदविला होता. मात्र, अद्याप संचिका गहाळ करणारा संबंधित अधिकारी अथवा कर्मचारी सापडलेला नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. कै. बाळकृष्ण काळू भोईर यांची जमीन १९७० मध्ये सिडकोसाठी भूसंपादित झाली होती. शासन नियमानुसार अधिक भूखंड मिळणे अपेक्षित असताना केवळ १९९.९९ चौ.मी.चा भूखंड देण्यात आल्याचा दावा करत उर्वरित भूखंडाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. संचिका चोरीमागे भूखंड प्रकरणातील गैरव्यवहार असू शकतो, असा संशयही मुंबईकर यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, ७० वर्षीय ज्येष्ठ नागरिक असलेल्या अरुण मुंबईकर यांनी संबंधित सिडको अधिकारी व कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली असून, चोरीला गेलेल्या संचिकेचा तातडीने शोध लावावा, अशी विनंती सीबीडी पोलिसांकडे केली आहे.

## निरोगी, आनंदी राहण्यासाठी योग महत्त्वाचे

करायचे आहे, ते साध्य होते. नेमून दिलेले कर्म विहित वेळेत, सातत्याने केले तर आपण चांगल्या विश्वाची निर्मिती करू शकतो. एकाग्रता मिळवण्यासाठी योग केले पाहिजे आणि योगात सातत्य आवश्यक आहे आणि आयुष्यात शिस्तीची गरज आहे. शिस्त योगाद्वारे लागते, आरोग्य सुधारते. आज प्रत्येकाला ताण-तणावाला सामोरे जावे लागते. त्यामुळे तणावमुक्त राहण्यासाठी आपण सर्वांनी आपल्या जीवनशैलीमध्ये नियमितपणे योगा, व्यायामांचा समावेश करावा. योग हा फक्त व्यायाम नसून, योगामुळे शारिरीक, मानसिक आरोग्य सुदृढ राहते. नियमित योगासने केल्याने शरीराला ऊर्जा प्राप्त होत असते. योगामुळे मनःशांती तर मिळतेच, शिवाय तणाव दूर होऊन एकाग्रतासुद्धा वाढण्यास मदत होते, असेही जिल्हाधिकारी म्हणाले.

जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनीदेखील उपस्थितांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या शुभेच्छा देत आपल्या आरोग्यासाठी नियमित योगा करण्याचे आव्हान केले.

यावेळी स्पर्धा विश्व अकॅडमीचा विद्यार्थी सौरभ समीर वर्तक याची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल व समीक्षा तांडेल हिची नवी मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

## आक्षीतील अंतर्गत रस्त्याचा शुभारंभ

व शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून विविध विकासकामे करण्यात आली आहेत. त्यामुळे आक्षी ग्रामपंचायत हद्दीतील गावांच्या विकासाला अधिक गती मिळाली आहे. दरम्यान, आक्षी येथील काळंबा देवी मंदिरासमोरील खारगल्ली रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली होती. स्थानिक शेकाप कार्यकर्त्यांनी ही बाब चित्रलेखा पाटील यांच्या निदर्शनास आणून देताच त्यांनी या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणासाठी पुढाकार घेतला. या रस्त्याचा भूमीपूजन सोहळा एप्रिल महिन्यात चित्रलेखा पाटील यांच्या हस्ते पार पडला होता. त्यानंतर रविवारी (दि.२१) आक्षी-खारगल्ली या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी आक्षी ग्रामपंचायतीच्या सरपंच रश्मी पाटील, सदस्य रश्मी वाळंज, निरजा नाईक, कुंजल पाटील, शेकाप कार्यकर्ते रवींद्र पाटील, रश्मिन गुरव, संतोष कवळे, रमेश केणी, अभिजीत वाळंज, संतोष राऊळ, अनिल म्हात्रे, प्रणित गुरव, गणेश पाटील, सूरज गुरव आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## बापाच्या नात्याला काळीमा

सुरु असलेला सदरचा छळ सहन न झाल्याने अखेर पीडित मुलीने लहान मुलांच्या मदतीसाठी कार्यरत असलेल्या चाईल्ड लाईन या हेल्पलाईनवर संपर्क साधून त्यांच्याकडे मदतीची याचना केली. त्यानंतर चाईल्ड लाईनच्या कार्यकर्त्यांनी पीडित मुलीसह खांदेश्वर पोलीस ठाणे गाठून तिच्या वडिलांविरोधात तक्रार दाखल केली. या घटनेचे गांभीर्य ओळखून खांदेश्वर पोलिसांनी विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणातील आरोपी बापाला तात्काळ अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांनी दिली.

## उलवे लॉज कनेक्शन पेणपर्यंत

१३ वर्षीय मुलीने दिलेल्या जबाबात तिच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध ठेवण्यात आल्याचा आरोप केला आहे. या जबाबामध्ये कुणाल नाईक, उपेंद्र कोलाडकर, अच्युत पाटील आणि प्रमोद पाटील यांची नावे समोर आल्याचे पोलिस सूत्रांकडून समजते. त्यानंतर उलवे पोलिसांनी संबंधितांना पेण पोलीस ठाण्यातून ताब्यात घेतल्याची माहिती मिळाली आहे. या आरोपांची सत्यता तपासातून स्पष्ट होणार आहे.

ही कारवाई पोलीस उपायुक्त अमित काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर गायकवाड आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक अर्जुन राजणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कृष्णा पाटील करीत असून, प्रकरणातील इतर बाबींचाही सखोल तपास सुरू आहे.

## जिल्ह्यात ३० जूनपर्यंत जलतरण तलाव बंद

दरम्यान, एल-निनोच्या संभाव्य परिणामामुळे मान्सूनचे आगमन अद्याप अपेक्षित वेगाने झाले नसून, उष्णतेच्या लाटेचाही परिणाम जिल्ह्यात जाणवत आहे. पाटबंधारे विभागाच्या माहितीनुसार, जिल्ह्यातील २८ लघुप्रकल्पांमध्ये सरासरी केवळ १७.८९ टक्के उपयुक्त जलसाठा उपलब्ध आहे, तर हेटवणे मध्यम प्रकल्पामध्ये २७.३१ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. महावेध पोर्टलवरील आकडेवारीनुसार २० जूनपर्यंत जिल्ह्यात केवळ ८.९ मि.मी., म्हणजेच सरासरीच्या सुमारे २ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

जलसंकटाची शक्यता लक्षात घेऊन स्विमिंग पूल बंद ठेवणे, आवश्यकतेनुसार पाणीपुरवठ्यात कपात करणे, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि अनधिकृत पाणीवापरावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशात नमूद केले आहे.यासंदर्भात सर्व तहसीलदार, नगर परिषद व नगर पंचायतांचे मुख्याधिकारी, पनवेल महानगरपालिका, ग्रामपंचायती, पाटबंधारे विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व जलतरण तलाव तात्काळ बंद राहतील याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच पाणीपुरवठ्यातील संभाव्य कपातीबाबत नागरिकांना पूर्वसूचना देऊन पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत व्यापक जनजागृती करण्याचे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

## भरधाव डंपरच्या धडकेत तरुण ठार

जोरदार धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या राज पतंगे याला तातडीने उपजिल्हा रुग्णालय, रोहा येथे दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पंकज अरुण मिस्त्री (रा. पाटणसई, ता. रोहा) याच्याविरोधात निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडविल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघातानंतर चालक घटनास्थळावरून निघून गेल्याचा आरोपही फिर्यादीत करण्यात आला आहे. पुष्कर महेंद्र जावरे (रा. रोहा) यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास रोहा पोलीस करीत आहेत.दरम्यान, राज पतंगे याच्या अकाली निधनामुळे अष्टमी परिसरात हळहळ व्यक्त होत असून, भिसे खिंडीत वाढत्या अपघातांमुळे वाहतूक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# सहा कोटींच्या निधीतून विविध कामांचे भूमीपूजन



● (छायाचित्र : संजय गायकवाड)

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा अधिक सक्षम आणि दर्जेदार स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी आ. महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून विविध विकासकामांसाठी मंजूर झालेल्या अंदाजे सहा कोटी रुपयांच्या निधीअंतर्गत कामांचा शुभारंभ करण्यात आला.

शिवसेनेचे गटनेते तथा नगरसेवक संकेत भासे यांच्या उपस्थितीत या विकासकामांचे भूमीपूजन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. याप्रसंगी नगरसेवक रामदास गायकवाड, किशोर कदम, वैभव सुरावकर, अरुणा वायकर, जान्हवी देवघरे, रोहित ओसवाल, मोहन ओसवाल, फुटरमल ओसवाल, दिनेश जैन, पंकज ओसवाल, अरविंद जैन, अजित ओसवाल, कुंदनमल ओसवाल आदी उपस्थित होते. या विकासकामांमुळे शहरातील अनेक प्रभागांमधील रस्ते, गटारे आणि इतर नागरी सुविधांशी संबंधित प्रश्न मार्गी लागणार असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या विकासकामांच्या भूमीपूजनाची सुरुवात दहिवली परिसरातील सोनार आळी येथून करण्यात आली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्ते व गटारांच्या कामांना अखेर हिरवा कंदील मिळाल्याने स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले. या कामांमुळे परिसराचा कायापालट होण्यास मदत होणार असल्याचे बोलले जात आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णनः-**

**मौजे-अंत्राट तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| अ. क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु - पै |
|---|---|---|---|---|
| १ | १८ | २ | ०-६०-०० पो.ख. ०-०५-०० | ०-४२ |
| २ | ३० | ८/क | २-१४-०० पो.ख. ०-३४-०० | १-५६ |
| | सर्व्हे नं. ३०/८/क या मिळकतीपैकी लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र १-००-००, हे-आर-पॉ, आकार ०-७३ रु.पै. | | | |

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईलः-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

**ॲड. प्रवीण शांताराम खडे**
पत्ताः- २, 'लक्ष्मी सदन', जुने एस.टी.स्टॅण्ड,
मु.पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

# जिल्ह्यात योग दिन उत्साहात साजरा

**भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत दि.२१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला होता. संयुक्त राष्ट्रांच्या १९३ देशांपैकी १७५ देशांच्या सहप्रतिनिधींनी या प्रस्तावाला पाठींबा दिला होता. अमेरिका, इंग्लंड, चीन, फ्रान्स, रशिया यासारखे देशही या प्रस्तावाचे सहप्रतिनिधी आहेत. त्यावर विस्तृत चर्चा करून या दिनाला मान्यता देण्यात आली आणि दि.२१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभर साजरा करण्यात आला. यंदा रायगड जिल्ह्यात १२ वा आंतरराष्ट्रीय योगा दिन रविवारी (दि.२१) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**

## भारत देश प्रगतीचे शिखर गाठेल

### मंत्री गजेंद्र सिंह यांचा विश्वास



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

भारताने जगाला आंतरराष्ट्रीय योग दिवस दिला आहे. त्यामुळे आधुनिक आणि नवीन संकल्पनेतून आपला देश प्रगतीचे शिखर गाठेल, असा विश्वास केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी व्यक्त केला आहे. मैत्रीबोध परिवाराने कर्जत येथील शांतिक्षेत्र प्रेमगिरी आश्रम येथे रविवारी (दि.२१) एका अनोख्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

मैत्रीबोध परिवार संस्था ही योगाला आंतरिक परिवर्तन आणि सामूहिक कल्याणाचा प्रभावी मार्ग मानते. योग हा केवळ शारीरिक व्यायाम नसून, भारताच्या सभ्यतागत आणि सांस्कृतिक वारशाचा अमूल्य भाग आहे. या विचाराला अधिक बळ देण्यासाठी मैत्रीबोध परिवार संस्थेतर्फे कर्जतमधील शांतिक्षेत्र प्रेमगिरी आश्रमात रविवारी योग दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मैत्री, संस्कृती आणि योगामुळे प्राप्त होणाऱ्या सर्वांगीण आरोग्य लाभांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. या विशेष प्रसंगी शेकडो लोक एकत्र जमले आणि योगाच्या खऱ्या स्वरूपाचा अनुभव घेत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा केला. यावेळी केंद्रीय संस्कृती व पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्यासह आमदार महेंद्र थोरवे, अभिनेते गोपाल अग्रवाल आणि प्रेमगिरी आश्रमाचे दादाश्रीजी हे उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान, मंत्री गजेंद्र सिंह यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, आधुनिक नवकल्पना आणि तांत्रिक प्रगती भारताला नव्या उंचीवर घेऊन जातील; परंतु, आपल्या आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांमुळेच भारताला पुढील वाटचालीत आवश्यक असलेली शक्ती, स्थैर्य आणि प्रज्ञा प्राप्त होईल, ज्यामुळे भारत जगात अद्वितीय राहील, असे गजेंद्र सिंह यांनी सांगितले.

या कार्यक्रमामुळे सहभागींना योगाचा अनुभव केवळ आसने आणि शारीरिक व्यायाम यापुरता मर्यादित न राहता, शरीर, मन आणि चेतना यांच्या एकात्मतेच्या रूपात घेता आला. कार्यक्रमाला सांस्कृतिक रंगत आणण्यासाठी गणेश वंदना तसेच भारताची प्राचीन योगिक कला असलेल्या मल्लखांबाचे मनोहारी सादरीकरण करण्यात आले. मल्लखांब ही शक्ती, लवचिकता, संतुलन आणि शिस्त विकसित करणारी भारतीय परंपरेतील एक अद्वितीय कला आहे. अध्यात्म, संस्कृती, सामुदायिक सहभाग आणि आरोग्य यांना एकाच व्यासपीठावर एकत्र आणणारा शांतिक्षेत्र प्रेमगिरी आश्रमातील हा आंतरराष्ट्रीय योग दिन सोहळा भारताच्या सनातन ज्ञानपरंपरेचे आणि आधुनिक युगातील तिच्या महत्त्वाचे प्रेरणादायी उदाहरण ठरला.

## श्रमिक विद्यालयात योगासनांची प्रात्यक्षिके

**। खांब । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे जागतिक योग दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक दिपक जगताप, सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी वर्ग उपस्थित होता. यावेळी योग म्हणजे काय? योगासने का करायला पाहिजे? तसेच, योगासनांचे शरीर व मनाला होणारे फायदे याबाबतचे मार्गदर्शन शिक्षकांकडून करण्यात आले. या कार्यक्रमात विविध योगासने व प्राणायाम यांची प्रात्यक्षिके दाखवून निरोगी व सुदृढ आरोग्यासाठी दररोज योगासने करणे काळाची गरज आहे, तर विद्यार्थी वर्गाने रोजच योगासने व प्राणायाम करून आपले शरीर निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्न करावे. अशाप्रकारचे आवाहन यावेळी शिक्षकांकडून करण्यात आले.



## अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर योग दिन संपन्न

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी मुंबईने अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन केले होते. यावेळी आंतरराष्ट्रीय योग दिनाची थीम ''दीर्घायुष्य आणि आरोग्यासाठी योग'' ही होती. या १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या आयोजनाची सर्व व्यवस्था एनसीसी युनिट जेएसएम कॉलेजने केली होती. यावेळी नाना पाटील हायस्कूल पोयनाड आणि महेंदले हायस्कूल रोहा हायस्कूलच्या कॅडेट्सनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमात एकूण १६० कॅडेट्सनी सहभाग घेतला होता. योगा सुरू होण्यापूर्वी, ६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी मुंबईचे सुभेदार मेजर अमर सिंग यांचे स्वागत प्रथम अधिकारी समाधान भंडारे आणि फर्स्ट ऑफिसर संदीप चांदुळकर यांनी केले. त्यानंतर कमांडिंग ऑफिसर कर्नल नितीश पटियाल आणि प्रशासन अधिकारी कर्नल आशिष कुमार यांनी योग दिवसांची आयोजनासाठी संपूर्ण नेतृत्व केले. जेएसएम कॉलेज एनसीसी युनिटचे कॅडेट सिद्धार्थ नाईक, आणि मेहेंदळे हायस्कूलच्या कॅडेट स्पंदन केतन भोसले यांनी योग प्रशिक्षण दिले. या कार्यक्रमात जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष माननीय ॲड. डॉ. गौतम पाटील यांनी कार्यक्रमाचे मार्गदर्शन केले. यावेळी जेएसएम कॉलेजच्या प्राचार्या डॉ. सोनाली पाटील यांच्यासह महाविद्यालयीन शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## स्टॉक एक्स्चेंजच्या प्रांगणात योगासने



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

योग दिनानिमित्त असोसिएशन ऑफ एनएसई मेंबर्स ऑफ इंडियाने नॅशनल स्टॉक एक्स्चेंजच्या सहकार्याने रविवारी (दि.२१) वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्समधील आयकॉनिक एनएसई एट्रिअम येथे आरोग्य व निरोगीपणा सत्राचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला भारतातील सर्वोच्च आर्थिक तज्ज्ञ, बाजारपेठेतील दिग्गज, नामवंत गुंतवणूकदार आणि प्रमुख ॲसेट मॅनेजमेंट कंपन्यांच्या प्रमुखांची प्रचंड उपस्थिती लाभली. भांडवली बाजारपेठेच्या अत्यंत ताणतणावाच्या वातावरणात सर्वांगीण आरोग्य, मानसिक स्पष्टता आणि तणाव व्यवस्थापनाला प्रोत्साहन देण्यासाठी हे सर्व दिग्गज एकत्र आले होते. या सत्राचे मुख्य आकर्षण म्हणजे जागतिक स्तरावरील आघाडीचे होलिस्टिक हेल्थ गुरू डॉ. मिकी मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली झालेले ऊर्जादायी आणि उत्साहवर्धक सर्वांगीण निरोगीपणाचे सत्र.

कॉर्पोरेट वातावरणात सतत बसून राहिल्याने येणारा ताण दूर करण्यासाठी विशेष तयार केलेल्या स्ट्रेचिंग रुटीन, मूलभूत योगासने आणि प्राणायामाच्या तंत्रांमध्ये बाजारपेठेतील नेत्यांनी सहभाग घेतला. शारीरिक सत्रांनंतर, उपस्थितांसाठी आरोग्य तज्ज्ञ सुश्री परमिता श्रॉफ यांनी तयार केलेल्या साऊंड हीलिंग, ध्यान आणि विश्रांतीचा अत्यंत शांत असा अनुभव दिला.



आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या विद्यमाने रविवारी सकाळी उलवे सेक्टर ९ येथील खारकोप तलाव येथे योग दिन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाला जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे पदाधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, उलवे पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी, तसेच उलवे मधील विविध सामाजिक संस्थेच्या सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष उत्साह आणि भव्यता प्राप्त झाली.



●(छायाचित्र : राजेश डांगळे)

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पनवेलमधील नीट परीक्षा केंद्रावर बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विविध योगासने आणि प्राणायाम करून योग दिन साजरा केला. कर्तव्य बजावत असतानाच निरोगी जीवनशैलीचा संदेश देत पोलिसांनी योगाचे महत्त्व अधोरेखित केले.



आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त रविवारी ८० फिटनेस स्टुडिओमध्ये आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा करण्यात आला.




## जेएनपीएत आंतरराष्ट्रीय योग दिन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाने आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. आयुष मंत्रालयाच्या निर्देशांनुसार तसेच बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाच्या सूचनेनुसार जेएनपीएच्या आवारात हा कार्यक्रम पार पडला. यंदाच्या वर्षीची जागतिक संकल्पना ''योगा फॉर हेल्थी एजिंग'' अर्थात ''निरोगी वृद्धत्वासाठी योग'' ही होती. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून जेएनपीएने तज्ज्ञ योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली योगसत्राचे आयोजन केले होते. त्यानंतर ब्रह्माकुमारी संस्थेच्या प्रतिनिधींनी उपस्थितांना गहन ध्यानधारणेचे सत्र घेतले. या सत्रांमध्ये जेएनपीएचे अध्यक्ष गौरव दयाल, उपाध्यक्ष रविश कुमार सिंह, सीआयएसएफ कमांडंट, सीआयएसएफ जवान तसेच जेएनपीएचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अशा उपक्रमांच्या माध्यमातून जेएनपीए आपल्या कर्मचाऱ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक आरोग्य आणि काम-जीवन समतोलाची संस्कृती रुजवत आहे. त्याचबरोबर योगाला जीवनाचा एक भाग बनवण्याच्या राष्ट्रीय चळवळीतही जेएनपीए योगदान देत आहे.

## नागोठण्यात योग गुरू क्लासतर्फे योग दिन उत्साहात



●(छायाचित्र : महेश पवार)

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

नागोठण्यातील योगा प्रशिक्षक यामिनी दिघे यांच्या योग गुरूकुल क्लास तर्फे नागोठण्यातील घरळी येथे योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात परिसरातील अनेक महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढविली. या कार्यक्रमाची सुरुवात योग प्रार्थनेने करण्यात आली. त्यानंतर विविध योगासने, सूर्यनमस्कार, प्राणायाम तसेच ध्यानधारणा यांचे प्रात्यक्षिक व सराव घेण्यात आला. सहभागी महिलांना योगाचे शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक लाभ समजावून सांगण्यात आले. नियमित योगा अभ्यासामुळे शरीर तंदुरुस्त राहते, मन शांत व सकारात्मक राहते तसेच अनेक आजारांपासून संरक्षण मिळण्यास मदत होते, अशी माहिती यावेळी यामिनी दिघे यांच्याकडून देण्यात आली. यावेळी सहभागी सर्व महिलांना प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच, महिलांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे, दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करण्यास प्रोत्साहन देणे आणि निरोगी समाज घडविण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. उपस्थित महिलांनी योगाबद्दलचे आपले अनुभवही व्यक्त केले आणि नियमित योगाभ्यास करण्याचा संकल्प केला.

## पनवेलमध्ये योग शिबिराचे आयोजन

**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त पनवेल महानगरपालिका व बाल कल्याण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने वडाळे सरोवर येथे भव्य योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. पहाटे ७ वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमात विविध योगासने, प्राणायाम तसेच ध्यानधारणेचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. या कार्यक्रमास महापौर, उपमहापौर, सभापती, नगरसेवक, पालिका अधिकारी, कर्मचारी, शाळेतील विद्यार्थी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. योगाचे महत्त्व आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देत सहभागी नागरिकांनी उत्स्फूर्तपणे योगाभ्यास केला. वडाळे सरोवर परिसर योगमय वातावरणाने भारावून गेला.



उरण शहरात रविवारी (दि.२१) सकाळी ठीक ठिकाणी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त उरण नगरपरिषदेच्या पेन्शणर पार्क येथील मराठी शाळेत योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी शेकडो महिला, विद्यार्थी व नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. यादरम्यान उपस्थितांना योगाचे महत्त्व सांगण्यात आले.

## राजिप शाळेत योगाभ्यास वर्गाचे आयोजन

**। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।**

आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून रा.जि.प. शाळा रासळ आदिवासी वाडी येथे विशेष योगाभ्यास वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता जगताप आणि उपशिक्षिका शिवानी पाखरे यांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून दिले. तसेच, विद्यार्थ्यांकडून अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने विविध प्रकारची योगासने आणि प्राणायाम करून घेतले. विद्यार्थ्यांनीही यात उत्साहाने सहभाग नोंदवत योगाचे धडे गिरवले.

आजच्या आधुनिक आणि कमालीच्या धावपळीच्या युगात मानवाला स्वतःसाठी वेळ देणे अत्यंत कठीण झाले आहे. या बदलत्या व गतिमान जीवनशैलीमुळे मनुष्य वेगवेगळ्या प्रकारच्या शारीरिक आणि मानसिक आजारांनी ग्रासलेला दिसून येत आहे. अत्यंत चिंतेची बाब म्हणजे अगदी लहान मुलांमध्येही उच्च रक्तदाब, हृदयविकार यांसारख्या गंभीर समस्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. या सर्व अनपेक्षित आजारांचे मुख्य कारण आपली आधुनिक व अयोग्य जीवनशैली हीच आहे. अशा परिस्थितीत मानवी आयुष्य निरोगी, आनंदी आणि दीर्घायुषी बनवण्यासाठी आपल्या दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व अनन्यसाधारण ठरते, असे यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.



●(छायाचित्र : धम्मशील सावंत)

### मुख्याध्यापिकेचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन

> "आमच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी योगासने ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित न ठेवता नियमितपणे करून घेतली जातात. शरीराला कोणतेही अतिरिक्त कष्ट न देता शरीर आणि मन एकाच वेळी सुदृढ व शांत ठेवण्याचे एकमेव सर्वोत्तम साधन म्हणजे योग होय."
> – स्मिता सुजित जगताप, मुख्याध्यापिका



●(छायाचित्र : उदय कळस)

## 'योग अभ्यासामुळे स्वास्थ्य लाभते'

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

दैनंदिन योग अभ्यासमुळे शरीर, मन, भावनांना स्वास्थ्य लाभते. जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेले, आरोग्य संपन्न करणारे शास्त्र म्हणजे ''योग''. दैनंदिन योग अभ्यासामुळे शरीर, मन, भावनांना स्वास्थ्य लाभते, असे प्रतिपादन मुख्याध्यापिका सुमित्रा खेडेकर यांनी केले. रविवारी (दि.२१) सकाळी ७.०० ते साडेआठ या वेळेत आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने खरसई योग प्रशिक्षक तथा सोमजाई माता ट्रस्ट खरसईचे संस्थापक चंद्रकांत खोत, मुख्याध्यापिका सुमित्रा खेडेकर, श्रीधर उमदी, जयश्री गायकवाड, नरेश गावित, पालक समीर दिवेकर, बालाजी राठोड, भाविक खोत आदि मान्यवर उपस्थित होते. येथील योग प्रशिक्षक चंद्रकांत खोत यांनी रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक मराठी शाळा म्हसळा येथील विद्यार्थांना योगाची प्रात्येक्षिके करून दाखवले आणि त्यामुलांकडून योगाची प्रात्येक्षिके देखील करून घेतले.



# शिवसेना अदखलपात्र

एकेकाळी शिवसेनेत बंडखोरी होणे हे अशक्यप्राय मानले जायचे. बाळासाहेब ठाकरे यांच्याशी गद्दारी म्हणजे या भूतलावरचे सर्वात मोठे पाप होते. आता सेनेतून बंडखोरी करणे हे दादर स्टेशनवर स्लो लोकल सोडून फास्ट लोकल पकडण्याइतके सोपे झाले आहे. भूतलावरचे ते पाप वगैरे उरलेले नाही. उलट या बंडखोरींच्या फास्ट गाडीत आधीच बसलेले लोक या नव्याने येणाऱ्यांचा हौसला वाढवण्यासाठी जोरजोरात ओरडत असतात. या बंडखोरांना कोणी शिव्या देऊ नये, अपाय करू नये म्हणून दक्ष असतात. परवा सेनेचे सहा खासदार फुटले व त्यांनी स्वतंत्र गट स्थापन केला. वास्तविक इतका मोठा निर्णय घेताना खासदारांनी स्वतः पुढे येणे अपेक्षित होते. आपण हा निर्णय का घेत आहोत हे सांगायला हवे होते. शिवाय आपण गट स्थापन करीत असल्याचे पत्र वगैरे दाखवायला हवे होते. पण लोकशाही व्यवस्थेतल्या संसद नावाच्या सर्वोच्च सभागृहाशी संबंधित हा निर्णय असूनही त्याच्याबाबत कमालीची गुप्तता पाळली जात आहे. या सहा खासदारांनी पत्रावर नक्की सह्या केल्या आहेत का, त्या पत्रात काय म्हटले आहे, हे पत्र त्यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना सोपवले का, त्याचा फोटो का प्रसृत झालेला नाही असे अनेक सवाल याबाबत उपस्थित होतात. पण सध्याच्या काळात नियम, संकेत इत्यादींना केव्हाच धाब्यावर बसवले गेले आहे. त्यामुळे गुप्तता राखणे हाच मोठा पराक्रम समजले जाते. असो. मुद्दा असा की, खासदारांनी बंडखोरी का केली याचे स्पष्ट कारण एकानेही बराच काळ समोर येऊन सांगितले नव्हते. त्यांच्याऐवजी इतरांचीच स्पष्टीकरणे येत होती व त्यात काय वाट्टेल ते पतंग उडवले जात होते. मुख्यमंत्र्यांचे चिरंजीव श्रीकांत शिंदे यांनी हे बंड घडवून आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. कारण उघड आहे. शिंदे गटाचे खासदार एकदम सहाने वाढले तर श्रीकांत शिंदे यांना केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान मिळण्याचा मार्ग मोकळा होतो.

## चला हवा येऊ द्या

मात्र हे करताना श्रीकांत शिंदे यांनी बंडखोरीची जी कारणे सांगितली आहेत ती चला हवा येऊ द्या या विनोदी कार्यक्रमात शोभतील अशी आहेत. शिंदे म्हणाले की, उद्धव ठाकरे हे काँग्रेसची स्तुती करीत असून त्यामुळे कट्टर शिवसैनिक नाराज झाले आहेत. ठाकरे हे आपली शिवसेना काँग्रेसमध्ये विलीन करणार असल्याच्या चर्चेनेही खासदार अस्वस्थ होते असा दावा शिंदे यांनी केला आहे. श्रीकांत शिंदे हे समस्त शिवसैनिक आणि महाराष्ट्राला बहुदा बालवाडीत असल्याचे समजतात. किंवा ते स्वतः मॉंटेसरीच्या रीतीने राजकारणाचा विचार करतात. शिंदे हे सर्जन डॉक्टर आहेत असे म्हणतात. इतके शिकलेल्या इसमाने किमान तर्काला धरून काही बोलावे अशी कोणाचीही अपेक्षा असेल. ठाकरे, काँग्रेस आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी २०१९ पासून महाविकास आघाडीमध्ये आहेत. ठाकरे हे इंडिया आघाडीच्या व्यासपीठावर अनेकदा गेले आहेत. गेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये सेना व काँग्रेस यांच्यात मैत्री होती. अनेकदा झगडेही झाले. पण तरीही ते एकत्र राहिले. भाजपच्या दादागिरीच्या व हुकुमशाही राजकारणाच्या विरोधात ठाकरे यांनी स्पष्ट भूमिका घेतली आहे. किंबहुना, म्हणूनच तर त्यांनी आपली भाजपसोबतची ३० वर्षांची युती तोडून काँग्रससोबत जाण्याचा निर्णय घेतला. याचे काही भले व काही बुरे परिणाम होऊन गेलेले आहेत. ही मैत्री करताना ठाकरे किंवा अन्य लोकांचे पक्ष स्वतंत्र राहतील हे सर्वांना स्पष्ट आहे. ठाकरे यांची शिवसेना ही कितीही कमकुवत झाली असली तरी ती कधीही इतर कोण्या पक्षात विलीन होण्याची शक्यता शून्य आहे हे सर्व महाराष्ट्र जाणतो. अशा स्थितीत श्रीकांत शिंदे हे बालिश युक्तिवाद करून कोणामध्ये गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत हे तेच जाणोत. उद्धव ठाकरे हे आमदार, खासदारांना भेटत नाहीत, कार्यकर्त्यांना निधी मिळत नाही वगैरे तक्रारी काही बंडखोरांच्या वतीने इतरांनी केल्या आहेत. खुद्द संजय राऊत यांनी परवा या बंडखोरांवर हल्ला चढवला तेव्हा ओमराजे निंबाळकर यांच्यासह सर्वांना निधीची हाव सुटली आहे असे ते म्हणाले.

## पैशांचा सोस

या संदर्भात काही मिडिया मुलाखतींमध्ये अरविंद सावंत यांनी अत्यंत रास्त प्रश्न उपस्थित केला. सरकारकडून निधी मिळवणे हे आमदार व खासदारांचे एकमेव काम आहे असे चित्र गेल्या काही वर्षांपासून जे रंगवले जाते आहे त्याला सावंत यांनी आक्षेप घेतला आहे. एकेकाळी या राज्यामध्ये उद्धवराव पाटील, भाऊसाहेब राऊत, एनडी पाटील, गणपतराव देशमुख, जयंत पाटील असे शेतकरी कामगार पक्षाचे अनेक दिग्गज नेते विरोधी पक्षात होते. त्यांनी विधिमंडळ व बाहेरही राजकारण गाजवले. ते व त्यांचे सहकारी कधीही निधीसाठी अडून राहिले नाहीत. त्यावेळचे काँग्रेसचे मुख्यमंत्री विरोधी पक्षनेत्यांबाबत सहानुभूतीने वागत. त्यांची कामे करीत हे खरे आहे. तरीही विरोधकांना सत्तारुढ आमदारांइतका निधी कधीच मिळत नव्हता. आणि तसा तो मिळत नाही म्हणून मतदारही लगेच यांना पराभूत करीत नव्हते. उलट त्यांना अधिकाधिक भरघोस मतांनी निवडून देत होते. आपला नेता काँग्रेसी सरकारला ताळ्यावर ठेवतो आहे याचा मतदारांना अभिमान असे. सरकारी निधी मिळणे हा सर्व आमदारांचा समान हक्क आहे. तुम्ही सत्तारुढ पक्षामध्ये या, अन्यथा, तुमचा निधी अडवून धरू ही भाषा उघडपणे अजित पवारांनी सुरू केली. त्याला खरे तर वेळीच चाप लावायला हवा होता. अजूनही या संदर्भात कोणीतरी कोर्टात जाऊन अशी विधाने करणाऱ्यांवर कारवाई होईल हे पाहायला हवे. याबाबत आपले मुख्यमंत्री किंवा विधानसभा अध्यक्ष इत्यादींनी खरे तर समतोल भूमिका घ्यायला हवी. पण ते स्वतःच पक्षीय राजकारणात इतके आरपार बुडाले आहेत की, बोलून सोय नाही. दरम्यान, निधीच्याच जोडीने उध्दव ठाकरे यांचे कथितरीत्या न भेटणे वगैरे सबबी अजून चालूच आहेत. एकनाथ शिंदे यांच्या पहिल्या बंडाच्या वेळी सर्व आमदारांनी सोईस्कररीत्या या सबबी वापरल्या. उदय सामंत यांच्यासारखे अत्यंत संधिसाधू व चार पक्षात फिरून आलेले आमदार सकाळी मातोश्रीवर जाऊन निष्ठेच्या आणाभाका वाहत होते आणि दुपारी तेच गृहस्थ सुरत आणि गुवाहाटीकडे रवाना झाले. शिंदे आणि मंडळींनी केलेला हल्ला आणि त्यांना कोश्यारी, नार्वेकर तसेच सर्वोच्च न्यायालयाने केलेली मदत यामुळे उध्दव ठाकरे यांची सेना व त्यांचे तळाचे कार्यकर्ते नीतीधैर्य गमावून बसले आहेत. त्याचेच प्रत्यंतर या पुन्हा पुन्हा होणाऱ्या फुटींमध्ये येत आहे. आता फुटीची बालिश कारणे सांगून शिवसेनेची टर उडवली जात आहे. हे करण्यातही एक डिझाईन आहे. महाराष्ट्रात सेना, बंगालमध्ये तृणमूल, उत्तरेत आम आदमी या पक्षांमध्ये किरकोळ कारणांवरून मनात येईल तेव्हा आपण फूट घडवून आणू शकतो हे भाजपच्या चाणक्यांना आणि त्यांच्या श्रीकांत शिंदे यांच्यासारख्या झिलकऱ्यांना दाखवून द्यायचे आहे. या सर्व पक्षांचे राजकारण दखलपात्र या संज्ञेच्या कित्येक फूट खाली आहे हे दाखवण्याचा हा मार्ग आहे.

विचार

# होर्मुजचे रणांगण विनाशकेंद्र न ठरो!

***इराण-अमेरिका करार झाला तरी होर्मुजची सामुद्रधनी हे आजच्या घडीला जागतिक भू-राजकारणाचे स्फोटक केंद्र बनले आहे. संसाधनांवर ताबा मिळवण्याच्या महासत्तांच्या संघर्षात या चिंचोळ्या जलमार्गाची कोंडी झाली. काही देशांच्या या संघर्षात जगाचे भविष्य नक्कीच अडकले आहे; पण ते कायमचे अंधारात ढकलले जाऊ नये, यासाठी जागतिक समुदायाने एकत्र येऊन संयमाने परिस्थिती हाताळणे आवश्यक आहे.***



प्रा. जयसिंग यादव

जगाच्या पाठीवर काही असे भौगोलिक प्रदेश आहेत, ज्यांच्यावर ताबा मिळवणे किंवा वर्चस्व गाजवणे म्हणजे संपूर्ण जागतिक व्यवस्थेची नाडी आपल्या हातात ठेवण्यासारखे आहे. मध्यपूर्वेतील होर्मुजची सामुद्रधुनी हे अशाच एका अत्यंत संवेदनशील आणि सामरिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण भू-राजकीय केंद्राचे नाव आहे. आजच्या घडीला या चिंचोळ्या सामुद्रधुनीला 'होर्मुजचे रणांगण' म्हटले, तर ते वावगे ठरणार नाही. कारण इथे केवळ प्रादेशिक सत्ताच नव्हे, तर जगातील महासत्तांचे हितसंबंध एकमेकांशी थेट धडकताना दिसत आहेत. त्यामुळेच आज संपूर्ण जगाला एकाच प्रश्नाने ग्रासले आहे, तो म्हणजे महासत्तांच्या या संघर्षात खरोखरच जगाचे भविष्य अडकले आहे का? होर्मुजचा संघर्ष नेमका काय आहे हे समजून घेण्यासाठी आधी होर्मुजचे भौगोलिक आणि आर्थिक महत्त्व समजून घेणे गरजेचे आहे. ओमान आणि इराण यांच्या दरम्यान असलेली ही सामुद्रधुनी एका बाजूला पर्शियन आखात आणि दुसऱ्या बाजूला ओमानचे आखात व अरबी समुद्राला जोडते. या समुद्राच्या पट्टीची रुंदी सर्वात अरुंद ठिकाणी केवळ ३३ किलोमीटर आहे, तर जहाजांच्या वाहतुकीसाठी उपलब्ध असलेला मार्ग केवळ तीन ते चार किलोमीटर रुंद आहे. जगातील एकूण खनिज तेल वाहतुकीपैकी सुमारे २० ते २५ टक्के वाहतूक एकट्या होर्मुजमधून होते. सौदी अरेबिया, इराक, संयुक्त अरब अमिराती (यूएई), कुवेत आणि कतार यांसारख्या प्रमुख तेल उत्पादक देशांचा तेल पुरवठा याच मार्गावर अवलंबून आहे. जगातील एलएनजी उत्पादनात आघाडीवर असलेला कतारही बहुतांश वायूपुरवठा याच मार्गाने करतो.

भारत, चीन, जपान आणि दक्षिण कोरियासारख्या आशियाई महासत्तांच्या ऊर्जा सुरक्षेची गुरुकिल्ली या होर्मुजच्या मार्गात दडली आहे. थोडक्यात सांगायचे, तर होर्मुजची सामुद्रधनी जागतिक अर्थव्यवस्थेचा 'हार्ट बीट' आहे. हा श्वास काही काळासाठी थांबला, तर संपूर्ण जगाला 'आर्थिक हृदयविकाराचा झटका' बसू शकतो. होर्मुजचे रणांगण तापण्याला प्रामुख्याने अमेरिका आणि इराण यांच्यामध्ये दशकांपासून चाललेला संघर्ष कारणीभूत आहे; मात्र आता यात चीन आणि रशिया या इतर दोन महासत्तांची उडी पडल्यामुळे हा प्रादेशिक वाद आता जागतिक शीतयुद्धाच्या नव्या आवृत्तीत बदलला आहे. अमेरिकेने नेहमीच होर्मुजच्या सामुद्रधुनीवर अप्रत्यक्ष लष्करी नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. बहरीनमध्ये असलेला अमेरिकेचा 'पाचवा नौदल ताफा' याच भागावर लक्ष ठेवून असतो. आंतरराष्ट्रीय व्यापार मार्ग खुला ठेवणे हे अमेरिकेचे अधिकृत उद्दिष्ट असले, तरी मध्यपूर्वेतील आपल्या मित्रदेशांचे (सौदी अरेबिया, इस्रायल) रक्षण करणे आणि इराणला रोखणे हा याम ागचा मुख्य हेतू आहे. इराण भौगोलिकदृष्ट्या होर्मुजच्या संपूर्ण उत्तरेकडील किनारपट्टीवर नियंत्रण ठेवतो. जेव्हा जेव्हा अमेरिकेकडून इराणवर आर्थिक निर्बंध लादले जातात किंवा लष्करी दबाव आणला जातो, तेव्हा इराणकडून होर्मुज सामुद्रधुनी बंद करण्याची धमकी दिली जाते. इराणकडे असलेले आधुनिक ड्रोन्स, नौदलाच्या छोट्या पण घातक बोटी आणि समुद्रात पेरल्या जाणाऱ्या सुरुंगांच्या जोरावर इराण या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत करू शकतो.

या संघर्षात आता चीन आणि रशियाने इराणची बाजू घेतल्याने समीकरणे बदलली आहेत. चीन हा जगातील सर्वात मोठा तेल आयातदार देश आहे आणि त्याचे ७० टक्क्यांहून अधिक तेल मध्यपूर्वेतून येते. चीनने इराणसोबत २५ वर्षांचा धोरणात्मक करार केला आहे. दुसरीकडे, युक्रेन युद्धानंतर रशियावर पाश्चात्य देशांनी घातलेल्या निर्बंधांमुळे रशिया आणि इराणचे लष्करी संबंध कमालीचे दृढ झाले. इराण, रशिया आणि चीन या तिघांनी ओमानच्या आखातात आणि अरबी समुद्रात अनेकदा संयुक्त नौदल सराव केले आहेत. हा सरळ सरळ अमेरिकेच्या वर्चस्वाला दिलेला इशारा आहे. गेल्या काही वर्षांमध्ये होर्मुझच्या परिसरात अनेक हिंसक आणि चिंताजनक घटना घडल्या आहेत. त्यामुळे हे क्षेत्र कधीही पेटू शकणाऱ्या दारूगोळ्याच्या कोठारासारखे झाले आहे. इस्रायल-हमास संघर्ष आणि त्यानंतर लाल समुद्रात हुथी बंडखोरांनी केलेल्या धुमाकुळानंतर होर्मुजवरही थेट परिणाम पहायला मिळाला आहे. इराणने अनेक पाश्चात्य किंवा इस्रायलशी संबंधित व्यापारी जहाजे जप्त केली आहेत. इस्रायल आणि इराण यांच्यातील थेट संघर्षाने आता मर्यादा ओलांडल्या आहेत. इराणवरील इस्रायलच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इराण होर्मुजच्या सामुद्रधनीचा वापर एक शस्त्र म्हणून करत आहे. २०१५ मधील इराण अणुकरार अमेरिकेने मोडीत काढल्यापासून इराणने आपले युरेनियम संवर्धन प्रचंड वाढवले आहे. इराण अणूबॉंब बनवण्याच्या जवळ पोहोचल्याची भीती पाश्चात्य देशांना आहे.

अमेरिकेने किंवा इस्रायलने इराणच्या अणुउर्जा केंद्रांवर हल्ला केला, तर होर्मुजची कोंडी करणे हेच इराणचे पहिले पाऊल असेल. जगाचे भविष्य खरोखरच अडकले आहे का, या प्रश्नाचे उत्तर दुर्दैवाने होय असेच द्यावे लागेल. होर्मुजची पूर्ण कोंडी झाल्यास आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाच्या किमती एका रात्रीमध्ये १५० ते २०० डॉलर्स प्रति पिंपाच्या पार जाऊ शकतात. तेलाच्या किमती वाढल्या, की जगातील प्रत्येक वस्तूची वाहतूक महाग होते. यामुळे आधीच महागाईने होरपळत असलेल्या जगाला तीव्र आर्थिक मंदीचा सामना करावा लागेल. सध्या जग महागाई आणि महामंदीच्या वाटेवर आहे. होर्मुजच्या कोंडीमुळे आशियाई देशांना, विशेषतः भारत आणि चीनला कच्च्या तेलाचा तुटवडा भासेल. कारखाने, वाहतूक व्यवस्था आणि वीजनिर्मिती केंद्र ठप्प होऊ शकतात. युरोप आधीच रशियन गॅसपासून वंचित आहे, त्याला कतारकडून मिळणारा एलएनजी बंद झाल्यास अंधाराचा सामना करावा लागू शकतो. आजचे आधुनिक शेती क्षेत्र हे पूर्णपणे इंधनावर आधारित आहे. ट्रॅक्टर्सपासून खतांच्या निर्मितीपर्यंत (ज्यासाठी नैसर्गिक वायू लागतो) सर्व काही ऊर्जेशी जोडलेले आहे. ऊर्जा संकटामुळे अन्नधान्याचे उत्पादन घटेल आणि जागतिक पातळीवर अन्नसुरक्षा धोक्यात येईल. होर्मुजमधील संघर्ष हा केवळ दोन देशांमधील वाद नाही. अमेरिकेने इराणवर लष्करी कारवाई केली आणि त्याला प्रत्युत्तर म्हणून चीन आणि रशियाने इराणला उघड किंवा छुपा पाठिंबा दिला, तर या प्रादेशिक युद्धाचे रूपांतर तिसऱ्या जागतिक युद्धात होण्याचा धोका नाकारता येत नाही.

होर्मुजच्या रणांगणात भारताचे हितसंबंध कमालीचे गुंतले आहेत. भारताची सुमारे ८० ते ८५ टक्के तेलाची गरज आयातीतून भागते. त्यातील मोठा वाटा पर्शियन आखातातून येतो. तसेच, मध्यपूर्वेतील देशांमध्ये ८० लाखांहून अधिक भारतीय नागरिक राहतात. ते भारताला दरवर्षी अब्जावधी डॉलर्सचे परकीय चलन पाठवतात. भारताचे अमेरिकेशी धोरणात्मक संबंध आहेत, इस्रायलशी घट्ट मैत्री आहे आणि इराणसोबत चाबहार बंदराच्या माध्यमातून ऐतिहासिक आणि आर्थिक ऋणानुबंध आहेत. त्यामुळे भारत कोणत्याही एका गटात सामील न होता शांततेचा पुरस्कार करतो. होर्मुजच्या समुद्रात भारतीय व्यापारी जहाजांच्या सुरक्षेसाठी भारतीय नौदलाने 'ऑपरेशन संकल्प'अंतर्गत आपल्या युद्धनौका तैनात केल्या आहेत. भारत इराणच्या चाबहार बंदराचा विकास करत आहे, जेणेकरून होर्मुजला वळसा घालून 'इंटरनॅशनल नॉर्थ-साउथ ट्रान्सपोर्ट कॉरिडॉर' (आयएनएसटीसी)च्या माध्यमातून रशिया आणि मध्य आशियाशी जोडले जाता येईल. होर्मुजच्या संघर्षातून जगाची सुटका करायची असेल, तर महासत्तांना आपल्या साम्राज्यवादी आणि वर्चस्ववादी मानसिकतेतून बाहेर यावे लागेल. अमेरिका आणि इराण यांनी पुन्हा एकदा चर्चेसाठी समोर येणे गरजेचे आहे. आर्थिक निर्बंध आणि लष्करी धमक्यांमुळे प्रश्न सुटण्याऐवजी गुंतागुंतीचा होत चालला आहे. 'युनायटेड नेशन्स कन्व्हेन्शन ऑन द लॉ ऑफ द सी'च्या नियमांनुसार, आंतरराष्ट्रीय जलमार्गांवरून सर्व देशांच्या व्यापारी जहाजांना सुरक्षित दळणवळणाचा अधिकार मिळायला हवा.

जगाने आता जीवाश्म इंधनावरील आपले अवलंबित्व कमी करून सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि हायड्रोजन यांसारख्या अक्षय ऊर्जेकडे वेगाने वळणे गरजेचे आहे. जगाची ऊर्जेची भूक मध्यपूर्वेतील तेलावर अवलंबून राहील, तोपर्यंत होर्मुजसारखी रणांगणे जगाला ओलीस धरत राहतील.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

चर्चा आजची

# मुंडेसाहेब, धाडसत्र सुरूच ठेवा!

राकेश लोहार

तुकाराम मुंडे नावाचा कायदेशीर आसूड इथल्या भ्रष्ट, भेसळखोर आणि माफियाराजावर चालू लागला आणि अनेकांचे धाबे दणाणले. कालपर्यंत राजरोसपणे सुरू असलेले माफियांचे अड्डे आज ओस पडू लागले आहेत. गुटखा, मटका, भेसळयुक्त दूध, बनावट पनीर, नकली तूप, रासायनिक खाद्यपदार्थ आणि काळाबाजाराच्या साखळ्यांनी व्यापलेली व्यवस्था अचानक सावध झाली आहे. गावोगावच्या पानटपऱ्या, गोदामे, गुप्त कारखाने आणि अड्ड्यांवर आज भीतीचे सावट आहे. कालपर्यंत खुलेआम सुरू असलेले व्यवहार आता बंद दरवाज्याआड गेले आहेत. ''आमच्याकडे आता फक्त सुपारी आणि सोफ मिळेल,'' असे सांगण्याची वेळ अनेकांवर आली आहे.

यातून एक गोष्ट स्पष्ट झाली आहे. व्यवस्थेने ठरवलं तर अवघ्या काही दिवसांत मी-मी म्हणणारे माफिया सूतासारखे सरळ होतात. कायद्याचा धाक निर्माण झाला की करोडो रुपयांचे साम्राज्य उभे करणारे लोकसुद्धा पळ काढतात. पण, दुर्दैवाने हा धाक निर्माण करण्याची इच्छाशक्ती अनेकदा दिसली नाही. त्यामुळे भेसळखोरांचे फावले. जनतेच्या आरोग्यावर घाला घालणाऱ्यांचे फावले. शेतकऱ्यांच्या कष्टांवर डल्ला मारणाऱ्यांचे फावले.

या भेसळीच्या विळख्यात सर्वाधिक भरडला गेला तो बळीराजा. दिवस-रात्र कष्ट करून गायी-म्हशींच्या धारा काढणारा शेतकरी आजही रडतोय. कारण, त्याच्या दुधाला भाव नाही. त्याच्या घामाला किंमत नाही. त्याच्या कष्टातून तयार होणाऱ्या शुद्ध दुधाची बाजारात किंमत कमी, आणि रासायनिक भेसळीने तयार होणाऱ्या बनावट दुधाची उलाढाल मात्र कोट्यवधींची. ही शोकांतिका अनेक वर्षे सुरू आहे.

जर बाजारातून भेसळयुक्त दूध, बनावट पनीर, नकली तूप आणि कृत्रिम दुग्धजन्य पदार्थ पूर्णपणे हद्दपार झाले, तर नैसर्गिकरित्या खऱ्या दुधाची मागणी वाढेल. मागणी वाढली तर भाव वाढेल. भाव वाढला तर शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे येतील. ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळेल. दुग्धव्यवसायाला नवी उभारी मिळेल. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ग्राहकांच्या ताटात आणि लहान मुलांच्या पेल्यात जाणारे पांढरे विष कायमचे बंद होईल.

आज प्रश्न केवळ दूध किंवा पनीरचा राहिलेला नाही. आपल्या ताटात येणाऱ्या प्रत्येक पदार्थात भेसळीची छाया शिरली आहे. मसाले, तेल, मिठाई, तूप, डाळी, फळे, भाज्या, पेये, औषधे आणि खाद्यपदार्थांच्या असंख्य प्रकारांत भेसळखोरांनी हातसफाई केली आहे. त्यांनी केवळ मालामध्ये भेसळ केली नाही; तर लोकांच्या विश्वासात भेसळ केली. त्यांनी आपल्या मुलांच्या आरोग्याशी खेळ केला. त्यांनी समाजाच्या भविष्यात विष कालवले. हे सगळे इतकी वर्षे सुरू राहिले, कारण कायद्याचे भय नव्हते. कारवाईची भीती नव्हती. पकडले गेले तरी सुटका होईल, अशी खात्री होती. राजकीय आश्रय, आर्थिक ताकद आणि यंत्रणेतील काहींच्या संगनमतामुळे भेसळीचे साम्राज्य दिवसेंदिवस वाढत गेले. अनेकांनी तक्रारी केल्या. अनेकांनी आवाज उठवला. पण मोठ्या प्रमाणावर परिणाम दिसला नाही.

मात्र, आता परिस्थिती बदलताना दिसत आहे. भेसळीचे साम्राज्य उभे करणाऱ्या माफियांच्या नरडीला हात लावण्याचे धाडस कोणीतरी केले आहे. तुकाराम मुंडे यांच्या नेतृत्वाखाली अन्न व औषध प्रशासनाने सुरू केलेल्या धडक मोहिमेमुळे भेसळीचे अड्डे एकामागून एक सील होत आहेत. माल जप्त होत आहे. गुन्हे दाखल होत आहेत. आणि अनेकांचे काळे धंदे उघड होत आहेत. तरीही या माफियांच्या चेहऱ्यावरचा माज पूर्णपणे उतरलेला नाही. संभाजीनगरमध्ये अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांवर जीवघेणा हल्ला करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. यावरून त्यांच्या आर्थिक साम्राज्याची व्याप्ती आणि त्यांच्या निर्ढावलेपणाची कल्पना येते. कारण, हा व्यवसाय केवळ भेसळीचा नाही; तर जनतेच्या आरोग्यावर चालणाऱ्या काळ्या बाजाराचा आहे.

आज महाराष्ट्रात एक भीती व्यक्त होत आहे. सगळे माफिया, त्यांचे राजकीय हितसंबंध आणि आर्थिक जाळे एकवटून तुकाराम मुंडेंची २६ वी बदली घडवून आणतील का? अशा चर्चांना उधाण आले आहे. कारण, यापूर्वीही अनेक वेळा कठोर कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांना बदलीच्या रूपाने शिक्षा मिळाल्याची उदाहरणे महाराष्ट्राने पाहिली आहेत. पण, यानिमित्ताने तुकाराम मुंडे यांना एक कळकळीचे आवाहन आहे-ग्राहकांना शुद्ध अन्न मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे. आणि चांगल्या दर्जाचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्याला त्याच्या कष्टाचा योग्य भाव मिळणे हा त्याचा अधिकार आहे. या दोन गोष्टी एकमेकांशी घट्ट जोडलेल्या आहेत. त्यामुळे सुरू असलेले हे युद्ध केवळ काही दिवसांची मोहीम ठरता कामा नये. तो प्रशासनाचा स्थायी स्वभाव बनला पाहिजे. तुमच्या आक्रमकतेमुळे शेतकरी, ग्राहक आणि सर्वसामान्य नागरिकांना आशेचा किरण दिसू लागला आहे. अनेक वर्षे चालणारी भेसळीची साखळी पूर्णपणे उखडून काढण्याची हीच वेळ आहे. राजकीय दबाव येतील. माफियांचे लागेबांधे आडवे येतील. यंत्रणेतील अडथळे निर्माण होतील. बदनामीचे प्रयत्न होतील. पण, हे युद्ध अर्धवट सोडता कामा नये. कारण, हा प्रश्न केवळ कायदा-सुव्यवस्थेचा नाही. हा प्रश्न महाराष्ट्रातील लाखो कुटुंबांच्या आरोग्याचा आहे. हा प्रश्न पुढच्या पिढीच्या भविष्याचा आहे. हा प्रश्न बळीराजाच्या अस्तित्वाचा आहे.

आज महाराष्ट्राला शंभर तुकाराम मुंडेंची गरज आहे. कारण गेल्या काही दिवसांत त्यांनी महाराष्ट्रभर कारवाईचा जो धडाका लावला आहे, त्यामुळे एक प्रामाणिक, निर्भीड आणि कर्तव्यदक्ष अधिकारी काय करू शकतो, हे त्यांनी पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. लहान मुलांच्या दुधात विष कालवून स्वतःची घरं भरणारे नराधम आज भेसळयुक्त दुधाचे टँकर ओतून पळू लागले आहेत. ही भीती कायम राहिली पाहिजे. कायद्याचा धाक कायम राहिला पाहिजे. भेसळखोरांच्या मनात प्रशासनाचा दरारा कायम राहिला पाहिजे.

मुंडेसाहेब, हे धाडसत्र थांबवू नका. कारण, महाराष्ट्रातील जनतेच्या ताटात शुद्ध अन्न पोहोचेपर्यंत आणि बळीराजाच्या घामाला योग्य भाव मिळेपर्यंत ही लढाई सुरूच राहिली पाहिजे.

लोकसंसद

## भारतीय नौदलाची ताकद वाढली

कोलकाता येथील गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनियर्स यांनी बांधणी केलेल्या 'आयएनएस दूनागिरी', 'आयएनएस संशोधक' आणि 'आयएनएस अग्रय' या तीन नव्या अत्याधुनिक युद्धनौकांचा भारतीय नौदलाच्या ताफ्यात नुकताच समावेश करण्यात आला आहे. या युद्धनौकांच्या बांधणीत ७५ टक्क्यांपेक्षा जास्त स्वदेशी साहित्याचा वापर करण्यात आला असून २०० हून अधिक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचा यात सहभाग आहे 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्रांनी सज्ज असलेल्या 'आयएनएस दूनागिरी' या युद्धनौकेमध्ये समुद्रात दूरवर जाऊन शत्रूशी लढा देण्याची अफाट क्षमता आहे. 'आयएनएस संशोधक' ही युद्धनौका अथांग आणि खोल समुद्रात सर्वेक्षणाचे काम करणार असून नौदलाला नेव्हिगेशनमध्ये मदत करणार आहे तर 'आयएनएस अग्रय' ही पाणबुडीविरोधी युद्धनौका असून भारताच्या किनारपट्टीच्या सुरक्षेसाठी आणि शत्रूच्या पाणबुड्यांचा वेध घेऊन त्यांना नष्ट करण्यासाठी ही युद्धनौका कार्यरत राहणार आहे. हिंदी महासागरातील चीनच्या नौदलाचा वाढता वावर आणि चाचेगिरीच्या धोक्यांना चोख प्रत्युत्तर देण्यासाठी येणाऱ्या काळात या युद्धनौका अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतील. संपूर्ण संरक्षण सज्जता आणि संसाधनांच्या निकषांवर अमेरिका, रशिया आणि चीन यांच्यानंतर भारताचे नौदल जगात चौथ्या क्रमांकावर असून या तीन युद्धनौकांमुळे भारतीय नौदलाची हिंदी महासागरातील ताकद लक्षणीयरीत्या वाढली आहे. **–प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# जागतिक पर्जन्यवन दिन



पर्जन्यवनांबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि या महत्त्वपूर्ण परिसंस्थांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देण्यासाठी २२ जून रोजी जागतिक पर्जन्यवन दिन साजरा केला जातो. तसेच हा दिवस जगभरातील पर्जन्यवनांच्या महत्त्वावर, त्यांच्या ऱ्हासामागील कारणांवर आणि त्यांच्या संवर्धनासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांवर प्रकाश टाकतो.

पर्जन्यवने केवळ जैवविविधतेने समृद्ध नाहीत, तर ती शक्तिशाली कार्बन शोषक म्हणूनही काम करतात, ज्यामुळे हवामान बदलाची तीव्रता कमी करण्यासाठी ती अत्यावश्यक ठरतात. ही वने पृथ्वीच्या हवामानाचे नियमन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांची घनदाट वनस्पती प्रकाशसंश्लेषणाद्वारे मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साइड (२) शोषून घेते आणि नैसर्गिक कार्बन सिंक म्हणून काम करते. कार्बन साठवून, वर्षावने हरितगृह वायू उत्सर्जनाचे परिणाम कमी करण्यास मदत करतात, वातावरणातील २ चे प्रमाण कमी करतात आणि जागतिक तापमानवाढीचा वेग मंदावतात. याव्यतिरिक्त, वर्षावने वातावरणात मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन सोडतात, ज्यामुळे आपल्याला श्वास घेण्यासाठी ऑक्सिजन मिळतो आणि पृथ्वीवरील जीवसृष्टीला आधार मिळतो. वर्षावनांमधील झाडे, वनस्पती आणि जीवांच्या नाजूक संतुलनातूनच ती शुद्ध हवा निर्माण होते, ज्यावर आपण आपल्या आरोग्यासाठी आणि कल्याणासाठी अवलंबून असतो. ही वने जैवविविधतेची प्रमुख केंद्रे असून, येथे वनस्पती आणि प्राणी प्रजातींची अविश्वसनीय विविधता आढळते. ती असंख्य जीवांना अधिवास प्रदान करतात, ज्यापैकी बरेचसे अजूनही अज्ञात आहेत. वर्षावनांमधील जीवविविधता केवळ विस्मयकारकच नाही, तर परिसंस्थांच्या लवचिकतेसाठी आणि त्या पुरवत असलेल्या सेवांसाठी अत्यावश्यक देखील आहे. तसेच पर्जन्यवने नैसर्गिक जल गाळणी म्हणून काम करतात, ज्यामुळे गोड्या पाण्याच्या स्रोतांची गुणवत्ता आणि उपलब्धता सुनिश्चित होते. तसेच, बाष्पोत्सर्जनाद्वारे हवामानाच्या पद्धतींवर प्रभाव टाकून ती स्थानिक आणि जागतिक हवामान नियमनातही योगदान देतात. याव्यतिरिक्त, वर्षावने अन्न, औषधे आणि कच्चा माल यांसारखी मौल्यवान संसाधने पुरवतात, जी स्थानिक समुदायांची उपजीविका टिकवून ठेवतात आणि आर्थिक विकासात योगदान देतात. पर्जन्यवनांचे प्रचंड पर्यावरणीय महत्त्व असूनही, वर्षावने मानवी कृतींमुळे गंभीर धोक्यांना सामोरे जात आहेत. प्रामुख्याने शेती, लाकूडतोड आणि पायाभूत सुविधांच्या विकासामुळे होणारी जंगलतोड ही एक मोठी चिंतेची बाब आहे. वर्षावनांच्या आच्छादनाचा ऱ्हास परिसंस्थांचा नाजूक समतोल बिघडवतो, हवामान बदलाची तीव्रता वाढवतो आणि असंख्य प्रजातींच्या अधिवासांना धोक्यात आणतो.

याव्यतिरिक्त, वन्यजीवांचा अवैध व्यापार, खाणकाम आणि अशाश्वत पद्धतींमुळे वर्षावन परिसंस्थांचा नाजूक समतोल आणखी धोक्यात येतो. हे धोके ओळखून, वर्षावनांचे संरक्षण आणि पुनर्संचयन करण्याच्या प्रयत्नांना कृती करणे आणि पाठिंबा देणे आपल्यासाठी अत्यावश्यक आहे.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२२ जून

१) श्री. मदन कृष्णाजी मोरे बाजारपेठ-अलिबाग, २२-६-१९५४

२) श्री. देवदास जॉर्ज वेश्वी-अलिबाग, २२-६-१९५७

३) श्री. नथुराम भिकू तळकर रामनाथ-अलिबाग, २२-६-१९५७

४)श्रीम. अस्मिता अशोक दिवेकर ब्राम्हण आळी, अलिबाग २२-६-१९६३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

## कोलाड परिसरात पावसाची एन्ट्री

**कोलाड :** गेली अनेक दिवसापासून चातकाप्रमाणे वाट बघणाऱ्या पावसाची जोरदार एन्ट्री रविवारी (दि.२१) कोलाड परिसरात दुपारी १. ३० वाजण्याच्या सुमारास झाली. यामुळे गेली अनेक दिवसांपासून पावसाची वाट बघणारा बळीराजा थोडा फार सुखावला आहे.
तर जोरदार पडलेल्या पावसाने उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना थोडा फार दिलासा मिळाला आहे. दरम्यान रोहिणी नक्षत्रानंतर म्हणजे २५ मे नंतर दरवर्षी भाताची पेरणी केली जाते परंतु पाऊस लांबल्यामुळे भात पेरणी करण्यासाठी उशीर झाला परंतु ७ जूननंतर मृग नक्षत्र निघाल्यानंतर पेरणी केली जाईल, असे असताना भारतीय हवामानाच्या अंदाजानुसार यावर्षी २० जूननंतर पावसाळा सुरुवात होईल असे सांगण्यात आले होते तो अंदाज खरा ठरत २१ जून रोजी कोलाड परिसरात पावसाचे जोरदार आगमन झाले. पावसाची वाट पाहणारा शेतकरी सुखावला असुन यापुढे आता तरी पाऊस पडत राहो, अशी अशा शेतकरी वर्गाने व्यक्त केली आहे.

# उल्हास नदी खोलीकरण फास्ट ट्रॅकवर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील भिवपुरी स्टेशन पासून कर्जत स्टेशन या भागात मध्य रेल्वेकडून कारशेड उभारले जाणार आहे. या कारशेडसाठी मोठ्या प्रमाणात मातीचा भराव करण्यात आला असून या भरावामुळे या भागातील गावांमध्ये पावसाळ्यात महापुराची पाणी शिरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

त्यामुळे स्थानिकांच्या आक्षेपानंतर रेल्वेच्या माध्यमातून त्या उल्हासनदीचे खोलीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. दरम्यान कर्जत तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी स्थानिक ग्रामस्थांना शब्द दिला होता आणि त्याप्रमाणे नदी खोलीकरण केले जात आहे.

कर्जत तालुक्यात रेल्वे प्रशासनाकडून कारशेड बांधले जात आहे. या कामासाठी मोठ्या प्रमाणावर मातीचा भराव केला जात आहे. मात्र हा परिसर



**महापुराचा धोका कमी करण्याचा प्रयत्न**

**पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढवण्यावर भर**

### खोलीकरण केले तरी धोका कायम: ग्रामस्थ

पावसाळ्यात या भागात जमणारे पावसाचे पाणी लक्षात घेऊन नदीचे खोलीकरण कितीही केले तरी उल्हास दनीकिनाऱ्यालगतच्या गावांमध्ये महापुराची पाणी शिरून नुकसान होणारच? असे या गावांमधील ग्रामस्थांना वाटत आहे. त्यामुळे प्रशासनाने नदी खोलीकरण करून पावसाळ्यातील महापुराची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न केला असल्याचे पुराचा धोका असणाऱ्या गावांमधून बोलले जात आहे.

उल्हास नदीच्या तीरावर असल्याने पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर महापुराचा धोका निर्माण झाला आहे. याकडे लक्ष वेधत स्थानिक ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तक्रार केली होती. याच पार्श्वभूमीवर तीन दिवसांपूर्वी कर्जतच्या तहसीलदारांनी स्वतः घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली होती. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून, पावसाळ्याचा कालावधी संपेपर्यंत भरावाचे काम बंद ठेवण्यात आले.

त्यानंतर रात्रीच्या वेळी मातीचा भराव टाकण्याचे काम सुरूच होते आणि परिणामी अनेक ग्रामस्थांनी कर्जत तहसील कार्यालयावर धडक दिली होती. त्यावेळी कर्जत तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी उल्हासनदीचे खोलीकरण आणि संवर्धन करण्याचे काम आपण रेल्वेकडून करून घेऊ असे आश्वासन दिले होते.

त्यानंतर उल्हासनदीच्या तीरावरील व्हावे,बेडसे या भागातील उल्हासनदीचे पात्र खोल करण्यास सुरुवात झाली आहे. तेथे नदी पात्रात असलेले खडक फोडून आणि नदीमधील गाळ माती काढून पावसाळ्यातील पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढवण्यावर भर देण्यात येत आहे.

जेसीबी आणि प्रिक्लेम मशीन यांच्या मदतीने हि कामे सुरु असून मोठ्या प्रमाणात नदी खोलीकरण केल्याने कारशेड साठी करण्यात आलेला भराव यामुळे निर्माण झालेला धोका कमी होईल असा प्रशासनाचा दावा आहे.

## स्मार्ट मीटरप्रकरणी नेरळ शिवसेना ठाकरे गट आक्रमक

### शाखेमध्ये तक्रारी आणून देण्याचे आवाहन



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ उपनगरात महावितरणच्या स्मार्ट मीटर विरोधात जनमत तयार झाले आहे. नेरळ गावातील वीज ग्राहकांनी शिवसेना शाखेकडे बळजबरीने नवीन मीटर बसवले जात असल्याच्या तक्रारी केल्या होत्या. त्यानुसार नेरळ शिवसेना ठाकरे गटाने मध्यवर्ती कार्यालयात बैठक घेतली आणि त्यावेळी आक्रमक भूमिका घेतली आहे.ग्रामस्थांनी आपल्या तक्रारी शाखेकडे आणून द्याव्यात आणि बळजबरी करून वीज मीटर बसवले जात असतील तर तत्काळ मध्यवर्ती कार्यालयात येऊन यांना कळवावे, आणि त्यानंतर शिवसैनिक येथे जाऊन महावितरणच्या त्या कंत्राटी कामगाराला खळखटॅकने समज दिली जाईल, असा दिलासा बैठकीतून दिला आहे.

स्मार्ट मीटर बसवण्यात येणार असल्याबद्दल राज्यभर याविरुद्ध वीज ग्राहक आक्रमक झाले आहेत. नेरळ गावात महावितरणकडून बळजबरीने स्मार्ट मीटर लावण्यात आल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे वीज ग्राहकांनी शिवसेना मध्यवर्ती कार्यालयाकडे आपल्या तक्रारी दिल्या आहेत. ही बाब लक्षात घेऊन शिवसेना ठाकरे पक्षाने मध्यवर्ती कार्यालयात वीज ग्राहक आणि शिवसैनिकांची बैठक बोलवली होती.त्यावेळी शहरप्रमुख बंडू क्षीरसागर यांनी स्मार्ट मीटर बाबत असलेले समज गैरसमज यांची माहिती करून दिली. त्यात आपला मित्र पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला सोबत घेऊन महावितरण आणि स्मार्ट मीटर विरुद्ध आंदोलन उभारण्याचे निश्चित करण्यात आले.त्यात स्मार्ट मीटर विरोधात सर्वांना कर्जत परिवर्तन आघाडीची भूमिका समजली पाहिजे यासाठी गावात बॅनर द्वारे आवाहन करण्याचा निर्णय घेण्यात आला.वीज ग्राहकांनी महावितरण कडून बळजबरी करून स्मार्ट मीटर बसवला जात असेल तर तत्काळ शिवसेना मध्यवर्ती कार्यालयाला कळवावे.आघाडीचे कार्यकर्ते आणि शिवसैनिक तेथे जाऊन प्रसाद दिला जाईल, असे आश्वासन वीज ग्राहकांना दिले.

## बेकायदा गौण खनिज वाहतुकीवर कारवाई



**। बोईसर । प्रतिनिधी ।**

पालघर जिल्ह्यात शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवून गौण खनिजाची बेकायदा वाहतूक सुरू असून या बेकायदा वाहतुकीविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयातील भरारी पथकाकडून धडक कारवाई करण्यात येत आहे. दोन दिवसांमध्ये तलासरी आणि मनोर परिसरामध्ये विनारॉयल्टी गौण खनिजाची वाहतूक करणारे चार ट्रक जप्त करण्यात आले असून याप्रकरणी लाखो रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

### भरारी पथकावर पाळत

बेकायदा गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीविरोधात कारवाई करणाऱ्या भरारी पथकावर काही व्यक्तींकडून पाळत ठेवली जात आहे. कारवाई करताना वाहन बदलणे, वेशांतर करून गुप्तता पाळली जात असली तरी कारवाईचा सुगावा लागताच नियुक्त केलेल्या इसमांद्वारे भरारी पथकाच्या सर्व हालचालींची खबर गौण खनिजाचे बेकायदा उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्या व्यक्तींपर्यंत तातडीने पोचवली जाते. त्यामुळे अनेक वेळा कारवाईच्या ठिकाणी पोचल्यावर भरारी पथकाला हाती काहीच न लागता कारवाईत अपयश येते.

पालघर जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय पायाभूत प्रकल्पांची अनेक ठिकाणी युद्ध पातळीवर कामे सुरू आहेत. या प्रकल्पांच्या ठिकाणी भराव आणि बांधकामासाठी माती, मुरूम, दगड, खडी सारख्या गौण खनिजाचा मोठ्या प्रमाणात पुरवठा करण्यात येत असून काही ठिकाणी शासनाचा महसूल बुडवून विना रॉयल्टी बेकायदेशीरपणे गौण खनिजाची वाहतूक केली जात असल्याच्या तक्रारी जिल्हाधिकारी कार्यालयाला प्राप्त होत आहेत. या तक्रारींच्या अनुषंगाने बेकायदेशीर गौण खनिज उत्खनन आणि वाहतुकीला प्रतिबंध करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विशेष भरारी पथकाची नेमणूक करण्यात आली आहे.

## पहिल्याच पावसात महावितरण विभागाची बत्तीगुल

**। तळा । प्रतिनिधी ।**

गेली दोन महिने देखभाल दुरुस्तीच्या कारणास्तव मंगळवारी खंडित करण्यात येणाऱ्या वीज पुरवठ्या नंतरही पहिल्याच पावसात महावितरण विभागाची बत्तीगुल झाल्यामुळे तळा महावितरण विभागाचे पितळ उघडे पडले आहे.

रविवारी पहाटे पाऊस सुरू होताच तळा तालुक्यातील बत्तीगुल होण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. दरवर्षी पावसाच्या अगमनापासूनच तळा तालुक्यात विजेचा लपंडाव सुरू होतो. एकदा गेलेली वीज जवळजवळ ४ ते ५ तास येत नाही यामुळे विजेअभावी नागरिकांची मोठी गैरसोय होते.पावसाळा सुरू व्हायच्या आधी महावितरण विभागाने झाडे तोडणे, बॉक्स मेंटेनन्स, ब्रेकर मेंटेनन्स, जिओडी मेंटेनन्स, जीर्ण खांब बदलणे यांसारखी पावसाळ्यापूर्वी करावयाची कामे वेळीच पूर्ण करणे गरजेचे असते.मात्र पावसाळा तोंडावर आला असताना देखील महावितरण विभागाची ही कामे पूर्ण झाली नव्हती परिणामी जराजरी ढगांचा गडगडाट अथवा रिमझिम पावसाला सुरुवात होताच महावितरण विभागाकडून तळा तालुक्याची बत्तीगुल करण्यात येते.

## रायडर्ससाठी ॲडव्हेंचरची सुरुवात

**रायगड :** शहरातील रस्ते असो, हायवेची सफर असो किंवा वीकेंडचा ॲडव्हेंचर प्लॅन रायगडच्या रायडर्ससाठी रोमांचाचा नवा अध्याय सुरू झाला आहे. स्टायलिश लूक आणि कोणत्याही रस्त्यावर राइड करण्याची क्षमता असलेल्या स्क्रॅम्बलर बाइक्स आता रायगडमध्ये दाखल झाल्या आहेत. प्रवासापासून ते ऑफबीट डेस्टिनेशनच्या शोधापर्यंत, प्रत्येक राइड अधिक रोमांचक बनवण्यासाठी या बाइक्स सज्ज आहेत.येझदी स्क्रॅम्बलर ३५० आणि बीएसएची नवीन स्क्रॅम्बलर आता अधिकृत डीलरशिपवर उपलब्ध आहे.

### आई-वडिलांच्या स्मरणार्थ शाळेला अनोखी भेट

## आयुक्त वैभव ढेरे यांच्याकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप

**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा आपटवणे येथे नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना आनंदाचा अनोखा अनुभव मिळाला. येथील शाळा सुरू होताच सोलापूरचे आयुक्त वैभव ढेरे यांनी आपल्या आई-वडिलांच्या स्मरणार्थ विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण घालून दिले.



शाळेच्या पहिल्या दिवशी सकाळी १० वाजता विद्यार्थी उत्साहात शाळेत दाखल झाले होते. यावेळी आयुक्त वैभव ढेरे यांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांना वह्या, पाण्याच्या बाटल्या, स्केच पेन, रंगीत खडू, बॅट, चेंडू आदी साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थी तसेच पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा नेहा ढिसे, उपाध्यक्षा मयुरी दंत, विशाल उतेकर, पांडुरंग निरगुडा, प्रकाश राठोड, चंद्रकांत दरवडे, संगीता लेंडे व मनस्वी दंत उपस्थित होते.

यावेळी शाळेचे शिक्षक गणेश म्हात्रे, राजेंद्र पाटील, नवनीत म्हात्रे आणि सीमा वैद्य यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्री. गणेश म्हात्रे यांनी आयुक्त वैभव ढेरे व त्यांच्या परिवाराचे मनःपूर्वक आभार मानले. आई-वडिलांच्या स्मृती जपतानाच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी दिलेले हे योगदान अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## पाली शहरातील रस्त्याची दयनीय अवस्था



**। पाली । प्रतिनिधी ।**

नगरपंचायत हद्दीतील १७ प्रभागातील रहदारीच्या रस्त्यांची पूर्णपणे खड्डेमे अवस्था झाली असून हे रस्ते पावसाळ्यापूर्वी दुरुस्त करून सुस्थितीत करावे. याकरिता पालीतील युवा सामाजिक कार्यकर्ते मयूर ठोंबरे यांनी पाली नगरपंचायतीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी निवेदन देऊनदेखील पावसाळा तोंडावर आला असतानाही नगरपंचायतीकडून खड्डे भरून रस्त्याची कोणतेही प्रकारची दुरुस्ती केली नसल्याने पुन्हा मयूर ठोंबरे यांनी पाली नगरपंचायतीला स्मरणपत्र दिले.

आपल्या नगरपंचायत हद्दीतील सर्व १७ प्रभागांमध्ये अनेक मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते व नागरिकांच्या दैनंदिन वापरातील मार्गावर मोठ्या प्रमाणात खट्टे पडलेले आहेत. पावसाळा जवळ आल्यामुळे या खड्ड्यांमध्ये पाणी साचून अपघात, वाहतूक कोंडी, दुचाकी घसरणे तसेच नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात आहे.

**मिठाईच्या दुकानांमध्येदेखील तारखा व दर न लावता मिठाई विक्री** | **अन्न व औषध प्रशासन केव्हा कारवाई करणार?**

# श्रीवर्धन तालुक्यात अवैध गुटख्याची विक्री सुरूच

**संतोष चौकर**
**। श्रीवर्धन ।**

काही महिन्यांपूर्वी श्रीवर्धन तालुक्यामध्ये अवैध विक्री सुरू असलेल्या गुटख्या बाबत तालुक्यातील पत्रकारांनी जोरदार आवाज उठवून बातम्या प्रसिद्ध केल्यानंतर सदर गुटखा विक्रेत्यांवरती अन्न व औषध प्रशासनाने कारवाई केली नव्हती. परंतु रायगड पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार श्रीवर्धन पोलिसांनी कारवाई करून गुन्हे दाखल केले होते.



मात्र आता कर्तव्यदक्ष सनदी अधिकारी तुकाराम मुंडे यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये अवैध गुटखा, त्याचप्रमाणे भेसळयुक्त पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर सतत कारवाया सुरू ठेवल्या आहेत. श्रीवर्धन तालुक्यात प्रतिबंधित असलेल्या गुटख्याची अवैध विक्री सर्रासपणे सुरू आहे. रायगड मधील अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना कायमस्वरूपी अभय दिल्याचे चित्र यामुळे पाहायला मिळते.

श्रीवर्धन तालुक्यामध्ये विविध कंपन्यांचे दही, दूध, लस्सी, ताक त्याचप्रमाणे पनीर विक्रीसाठी बाजारात येत असते. मात्र मागील अनेक वर्षांपासून अशा दुग्धजन्य पदार्थांची कोणत्याही प्रकारची तपासणी अन्न व औषध प्रशासनाकडून करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे श्रीवर्धन तालुक्यात अनेक मिठाईची दुकाने देखील आहेत. या मिठाईच्या दुकानांमध्ये विक्रीसाठी ठेवलेली मिठाई याच्यावरती कोणत्याही प्रकारचे दरपत्रक व मिठाई बनवलेल्याची तारीख लावलेली नसते. फक्त अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी श्रीवर्धनला येतात सगळ्यांकडून मलिदा घेऊन निघून जातात. त्या एका दिवसापूरते दरपत्रक व मिठाईची तारीख लावलेली असते. श्रीवर्धन तालुक्यात विक्रीसाठी येत असलेले दूध हे पर जिल्ह्यातून येत असते. यामध्ये विशेष करून सातारा व पुणे या जिल्ह्यातील दूध व दुग्धजन्य पदार्थांचा समावेश आहे. तरी अन्न व औषध प्रशासनाने सदर दूध उत्पादक डेऱ्या व त्यांचे दुग्धजन्य पदार्थ याची देखील काटकोर पणे तपासणी करावी.

तसेच श्रीवर्धन तालुक्यात विक्री साठी ठेवण्यात येणारी चिप्स, कुरकुरे, हल्दीरामचे विविध पदार्थ यांची फॉरेन्सिक तपासणी होणे गरजेचे आहे. राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी रायगड जिल्ह्यात विशेष लक्ष द्यावे. जे नागरिक या दुग्धजन्य पदार्थांचा व दुधाचा उपयोग आपल्या रोजच्या जीवनामध्ये करतात त्यांच्या आरोग्याशी कोणी खेळत असेल तर त्याच्यावर योग्य ती कारवाई व्हावी अशी मागणी सामान्य नागरिकांमधून केली जात आहे.

## निवडक

### वीज व्यवस्थेत डिजिटल क्रांती

**रायगड :** महाराष्ट्रात वीज वापर, व्यवस्थापन आणि बिल भरण्याच्या पद्धतीत मोठा बदल घडत असून स्मार्ट मीटरचा स्वीकार वेगाने वाढत आहे. राज्यात रिवॅम्प्ड डिस्ट्रिब्युशन सेक्टर स्कीम अंतर्गत २.४ कोटी वीज मीटर स्मार्ट मीटरमध्ये रूपांतरित करण्याचे काम सुरू आहे. कोल्हापूर, सांगली, गडचिरोली, पालघर आणि सोलापूरसह अनेक जिल्ह्यांमध्ये या प्रकल्पाची लक्षणीय प्रगती होत असून डिजिटल वीज व्यवस्थेकडे राज्याची वाटचाल अधिक वेगवान झाली आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये स्मार्ट मीटरचा स्वीकार ९० टक्क्यांहून अधिक झाला आहे. पन्हाळा परिसरात जवळपास १०० टक्के स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत, तर सांगली आणि गडहिंग्लज विभागातील अनेक भागांमध्येही त्याचे प्रमाण मोठे आहे. विशेष म्हणजे, गडचिरोलीतील आरमोरीसारख्या दुर्गम भागांमध्येही स्मार्ट मीटरचा वापर ९५ टक्क्यांपेक्षा जास्त झाला असून ग्रामीण भागातही या तंत्रज्ञानाचा वाढता स्वीकार दिसून येत आहे. या प्रकल्पाच्या अंमलबजावणीत ॲडव्हान्स्ड मीटरिंग इन्फ्रास्ट्रक्चर सर्व्हिस प्रोव्हायडर्स महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. अदाणी, मॉन्टेकार्लो आणि एनसीसी यांसारख्या कंपन्यांमार्फत राज्यभर स्मार्ट मीटर बसविण्याचे काम सुरू आहे. उपलब्ध माहितीनुसार, अदाणीने आपल्या कार्यक्षेत्रातील ५० टक्क्यांहून अधिक काम पूर्ण केले असून मॉन्टेकार्लो आणि एनसीसी यांचीदेखील प्रगती वेगाने सुरू आहे. त्यामुळे राज्यभर स्मार्ट मीटरचा विस्तार अधिक मजबूत होत असल्याचे चित्र दिसून येते.स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना त्यांच्या वीज वापराची जवळपास प्रत्यक्ष वेळेत माहिती मिळत आहे.मोबाईल ॲप्स, डिजिटल डॅशबोर्ड आणि अलर्ट्सच्या मदतीने वीज वापरावर लक्ष ठेवणे अधिक सोपे झाले आहे.



### प्रशांत पाटील यांना भावपूर्ण अभिवादन

उरण: राष्ट्रवादी काँग्रेस पक्षा (शरदचंद्र पवार) चे प्रदेश सरचिटणीस तथा प्रकल्पग्रस्त, सर्वसामान्य नागरिकांचे आधारस्तंभ स्वर्गीय प्रशांतभाऊ बाळकृष्ण पाटील यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त शनिवारी उरण तालुक्यात विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांद्वारे त्यांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. सर्वत्र भावनिक वातावरणात त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. जेएनपीटी टाऊनशिप येथील मल्टीपर्पज हॉलमध्ये जवाहरलाल नेहरू पोर्ट अथॉरिटीचे बोर्ड मेंबर दिनेश पाटील यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या ङ्गङ्गभक्तीमय आदरांजलीङ्गङ्ग कार्यक्रमाला विविध राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि प्रशांतभाऊंवर निस्सीम प्रेम करणारे शेकडो मित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळी ९ ते १२ या वेळेत झालेल्या या कार्यक्रमात भक्तिगीत आणि अभंगांच्या सुरेल सादरीकरणातून उपस्थितांच्या मनात प्रशांतभाऊंच्या आठवणी जाग्या झाल्या. त्यानंतर अंबिकावाडी, नागाव येथील जीवनमुक्त स्वामी मठात उरण नगराध्यक्षा भावना घाणेकर यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या भजन-कीर्तन व अभंग सुमनांजली कार्यक्रमातही भावपूर्ण वातावरण निर्माण झाले. भजनांच्या सुरांत आणि कीर्तनाच्या ओव्यातून स्व. प्रशांतभाऊंच्या सामाजिक, राजकीय आणि मानवी कार्याचा गौरव करण्यात आला. अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले आणि उपस्थितांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

### अनधिकृत नळजोडणी खंडित कारवाई

**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या मोरबे धरणातून शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या २०५० मि.मी. व्यासाच्या मुख्य भूमिगत जलवाहिनीवर पनवेल तालुक्यातील देवद व विचुंबे ग्रामपंचायत हद्दीत काही व्यक्तींमार्फत अनधिकृत नळजोडणी करून पाण्याचा वापर होत असल्याची तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने तात्काळ घटनास्थळी पाहणी केली असता मुख्य जलवाहिनीवर सुमारे १०० मि.मी. व्यासाची अनधिकृत नळजोडणी करण्यात आल्याचे निदर्शनास आले होते. या प्रकरणी एप्रिल २०२५ मध्ये सदर अनधिकृत नळजोडणी महानगरपालिकेमार्फत त्वरित खंडित करण्यात आली होती. तसेच विचुंबे व देवद ग्रामपंचायतींना अनधिकृत नळजोडणीद्वारे वापरलेल्या पाण्यापोटी दंडात्मक स्वरूपाची रक्कम भरण्याबाबत नोटीस बजाविण्यात आली होती. त्यानंतर जानेवारी २०२६ मध्ये मुख्य जलवाहिनीवरील ब्रेकडाऊन दुरुस्तीच्या वेळी त्याच ठिकाणी पुन्हा अनधिकृत नळजोडणी करण्यात आल्याचे आढळून आले. सदर जोडणी खंडित करण्यासाठी महानगरपालिकेने कारवाई हाती घेतली असता काही स्थानिकांकडून विरोध करण्यात आला. त्यामुळे त्यावेळी सदर जोडणी खंडित करणे शक्य झाले नाही. तसेच देवद व विचुंबे ग्रामपंचायतींना सदर अनधिकृत जोडणी त्वरित काढून टाकण्याबाबत व दंडात्मक रक्कम भरण्याबाबत नोटीस देण्यात आली होती. तथापि, त्यांच्याकडून कार्यवाही करण्यात आली नाही. त्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने नवी मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत खांदेश्वर पोलीस स्टेशन यांचेकडील पोलीस बंदोबस्तात संबंधित अनधिकृत नळजोडणी खंडित करण्यात आली. महानगरपालिकेच्या पथकाने केलेल्या पुढील तपासणीत याच ठिकाणी मुख्य जलवाहिनीवर पुन्हा छेडछाड करून पाण्याचा अनधिकृत वापर सुरू असल्याचे आढळून आले.

### शैक्षणिक साहित्यासाठी ग्राहकांची झुंबड

**रेवदंडा :** नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर रेवदंडा बाजारपेठेत शालेय साहित्य खरेदीसाठी विद्यार्थ्यांसह पालकांची मोठी गर्दी होत आहे. पंचक्रोशीतील विविध गावांमधून ग्राहक रेवदंडा बाजारपेठेत दाखल होत असून वह्या, पुस्तके, शालेय गणवेश, बूट, दप्तर तसेच इतर शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी दुकानांमध्ये झुंबड उडाल्याचे चित्र दिसून येत आहे. शाळा सुरू झाल्याने विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या साहित्याची खरेदी करण्यासाठी पालकांची लगबग वाढली आहे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत बाजारपेठेत ग्राहकांची वर्दळ कायम असून अनेक दुकानांमध्ये गर्दीमुळे खरेदीसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. व्यापाऱ्यांच्या मते, मागील काही दिवसांपासून शैक्षणिक साहित्याच्या विक्रीत मोठी वाढ झाली असून पुढील काही दिवस ही गर्दी कायम राहण्याची शक्यता आहे. बाजारपेठेतील वाढलेल्या गर्दीमुळे वाहनतळ व वाहतूक व्यवस्थेवरही काही प्रमाणात ताण निर्माण होत आहे. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर रेवदंडा बाजारपेठ पुन्हा एकदा गजबजून गेली असून विद्यार्थी व पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# रायगडातील पावसाळी पर्यटन ठप्प

## ताम्हिणी घाट, देवकुंड, अंधारबन व खजिना ट्रेक पावसाअभावी ओस

**। पाली । प्रतिनिधी ।**

पाटणूस, भिरा, विळे, रवाळजे व पुण्याच्या सीमेवर असलेला ताम्हिणी घाट आदी परिसरात निसर्गाचा अमूल्य ठेवा दडला आहे. येथील अद्वितीय देवकुंड, रोमहर्षक खजिना व अंधारबन ट्रेक, समृद्ध निसर्ग, फेसाळणारे धबधबे देशभरातील पर्यटकांसाठी दरवर्षी पावसाळी पर्यटनाची मोठी पर्वणी ठरते. मात्र, यंदा जूनचा पंधरवडा उलटून गेला तरी रायगड जिल्ह्यात पावसाचे दमदार आगमन न झाल्याने या संपूर्ण परिसरातील पावसाळी पर्यटनाचा पुरता हिरमोड झाला आहे. पाऊस लांबल्याने पर्यटक नाराज असून, पर्यटक व निसर्गप्रेमींनी या भागाकडे पाठ फिरवल्याचे चित्र आहे.



दरवर्षी या दिवसांत ताम्हिणी घाटात सह्याद्रीच्या उंच व रांगड्या डोंगररांगांवरून कोसळणाऱ्या पांढऱ्याशुभ्र धबधब्यांच्या फेसाळणाऱ्या पाण्यात भिजण्यासाठी आणि धुक्याची चादर अनुभवण्यासाठी देशभरातून पर्यटक येथे मोठी गर्दी करतात. कुंडलिका नदीचे उगमस्थान असलेल्या देवकुंड येथील निसर्गसौंदर्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते. मात्र, यंदा पावसाअभावी येथील जलप्रपात आणि ट्रेकिंगचे मार्ग अद्याप कोरडेच असल्याने सर्व पर्यटन स्थळांवर शुकशुकाट पाहायला मिळत आहे.

माणगाव तालुक्यातील पाटणूस, भिरा, विळे व रवाळजे ही गावे सह्याद्रीच्या कुशीत वसली असून, त्यांच्या अवतीभवती अजस्त्र पर्वत रांगा आहेत. या परिसरात नैसर्गिक जैवविविधता प्रचंड आहे. सह्याद्रीच्या अंगाखांद्यावरून कोसळणारे धबधबे पुढे नदीरूपाने अरबी समुद्राकडे आगेकूच करतात. परंतु, यंदा पावसाने दडी मारल्यामुळे हे विलोभनीय दृश्य अजूनही पाहायला मिळालेले नाही.

भिरा येथील मदेवकुंडफ हे झपाट्याने पर्यटनाच्या नकाशावर आलेले सर्वात प्रसिद्ध व विलोभनीय ठिकाण आहे. येथूनच कुंडलिका नदीचा उगम होतो. या भागात पर्यटकांची संख्या दरवर्षी लाखांच्या घरात जाते. तसेच खजिना व अंधारबन डोंगरावरील ट्रेक प्रसिद्ध असून, येथे दुर्मिळ गिधाडांचे वास्तव्य आहे. या उंच डोंगरावरून भिरा धरणाचा विस्तीर्ण जलाशय, नद्या व आकर्षक परिसर दृष्टिक्षेपात येतो. मात्र, सद्यस्थितीत पाऊस नसल्याने येथील पर्यटन थांबले आहे.

> सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या आमच्या विभागाला निसर्गाची मोठी देणगी लाभली आहे. देवकुंड, ताम्हिणी घाट, अंधारबन ट्रेक, सिक्रेट पॉईंट याठिकाणी देशभरातून पर्यटक येतात. मात्र, यंदा पाऊस लांबल्याने पर्यटकांची पावले थबकली आहेत. याचा थेट फटका स्थानिक व्यावसायिकांना बसला आहे. लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. आदिवासींचा रोजगारही हिरावला आहे. आम्ही सर्वजण आता दमदार पावसाची प्रतीक्षा करत आहोत.
> –आंदेश दळवी, माजी उपसरपंच व व्यावसायिक, पाटणूस.

> ताम्हिणी घाटातील अप्रतिम निसर्ग आणि फेसाळणारे धबधबे मनाला प्रसन्न करतात. दरवर्षी आम्ही या काळात मित्रपरिवारासह येतो. मात्र, यंदा पाऊसच नसल्याने निसर्गाचे ते रूप पाहायला मिळाले नाही आणि हिरमोड झाला आहे.
> –गिरीश म्हात्रे, पर्यटक.

विळ्यापासून पुण्याकडे जाताना सुरू होणारा ताम्हिणी घाट पावसाळ्यात जणू स्वर्ग भासतो. घाटातील एका बाजूला डोंगर, दुसऱ्या बाजूला दरी, खाली उतरलेले ढग आणि हिरवागार निसर्ग पाहून पर्यटक चिंब भिजण्याचा आनंद घेतात. तसेच कुंडलिका नदीतील व्हाईट वॉटर रिव्हर राफ्टिंग चा आनंद घेतात. मात्र पावसाअभावी या ठिकाणी पर्यटकांचा हिरमोड झाला आहे.

# १५ जुलैपासून आंतरराष्ट्रीय उड्डाणे

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून १५ जुलैपासून आंतरराष्ट्रीय प्रवासी तसेच मालवाहतूक सेवांना प्रारंभ करण्यासाठी अंतिम तयारी सुरू असून, त्याच दिवशी पहिले आंतरराष्ट्रीय उड्डाण सुरू होण्याची अपेक्षा असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. जे. के. शर्मा यांनी बुधवारी प्रसारमाध्यमांना दिली.

बीसीबीएच्या २०२६ लॉजिस्टीक कॉनक्लेव्हच्या निमित्ताने प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना शर्मा म्हणाले की, १५ जुलैपासून मालवाहू विमानसेवा सुरू करण्यात येणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात आठवड्याला सुमारे १८ मालवाहू उड्डाणे सुरू होतील.

याचबरोबर आंतरराष्ट्रीय प्रवासी सेवाही त्याच दिवशी सुरू करण्यासाठी हालचाली सुरू असून, त्याबाबत सकारात्मक संकेत मिळत आहेत.नवी मुंबई विमानतळावरून एअर इंडिया एक्स्प्रेस आणि इंडिगो या दोन्ही कंपन्या आंतरराष्ट्रीय उड्डाणे चालविणार असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रीय अप्रत्यक्ष कर व सीमाशुल्क मंडळाच्या सदस्यांनी मंगळवारी विमानतळाच्या तयारीचा आढावा घेतला असून, आवश्यक अधिसूचना जारी करण्यात आल्या आहेत.

सीमाशुल्क विभागाच्या कलम ४५ अंतर्गत प्रक्रिया आणि कुरिअर तसेच कार्गो कोडसंदर्भातील चाचण्या पूर्ण केल्यानंतर सुमारे ५ जुलैपर्यंत व्यापारविषयक अधिसूचना जारी होण्याची अपेक्षा असल्याचे शर्मा यांनी स्पष्ट केले. डिसेंबर २०२५ पासून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर देशांतर्गत सेवा सुरू झाली असून, सध्या दररोज सुमारे २० हजार प्रवासी आणि १५० विमान हालचाली होत आहेत.

## निवडक



### शालेय साहित्य वाटप कार्यक्रम उत्साहात

**सुतारवाडी :** रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक केंद्र शाळेत प्रमोद अनंत म्हसकर सामाजिक प्रतिष्ठान यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी व उज्ज्वल भविष्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून पालकांनीही या सामाजिक कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमास मुख्याध्यापक मोहन राठोड, शिक्षक अविनाश जाधवर तसेच सामाजिक प्रतिष्ठानचे पदाधिकारी दिनेश देशमुख, रुपेश जांबेकर, दर्शन मांडूस्कर, सुमित जाधव, गणेश बामणे, प्रतीक वरे यांच्यासह सामाजिक संस्थेचे पदाधिकारी आणि अनेक पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालक शमिका पंदेकर, दीपिका धोंडगे,चव्हाण, अस्मिता कामथेकर यांच्यासह इतर मान्यवरांनी कार्यक्रमास उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत मेहनत, जिद्द आणि सातत्य यांच्या जोरावर यश संपादन करण्याचे आवाहन केले. या स्तुत्य उपक्रमाबद्दल शाळा व्यवस्थापन, शिक्षकवर्ग, पालक आणि विद्यार्थ्यांनी आभार व्यक्त केले.

### रक्षकांचे प्रश्न सोडवण्याची मागणी

**नवीन पनवेल :** रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षारक्षकांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्याची मागणी विनायक गांधी यांनी केली आहे. नोंदित सुरक्षारक्षकांना नोकरी मिळण्यासाठी जून २०२५ मध्ये कामगार मंत्री यांच्या दालनात बैठक आयोजित केली होती. त्यानंतर स्वतंत्र मेगा ड्राईव्ह लावण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र किती कंपन्या मंडळात नोंदी झाल्या, किती कंपन्यांवर कारवाई करून मंडळाचे सुरक्षा रक्षक तैनात केले गेले आणि काय कारवाई केली गेली त्याची माहिती रायगड सुरक्षा रक्षक मंडळाकडून सादर करण्यात आलेली नाही. रायगड जिल्हा कार्यक्षेत्रात इतर बृहन्मुंबई, ठाणे, पालघर सुरक्षा रक्षक मंडळाचे सुरक्षारक्षक मागील अनेक वर्ष काम करत आहेत. त्यामुळे रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षारक्षकांनी जायचे कुठे असा प्रश्न उपस्थित होत आहे. काही आस्थापनांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून सुरक्षारक्षक म्हणून काम केले जाते आणि कागदोपत्री या कर्मचाऱ्यांचा उल्लेख केअर टेकर म्हणून संबोधला जात आहे, अशामुळे शासन नियमांची फसवणूक होत असल्याचे विनायक गांधी यांची म्हणणे आहे. तसेच सुरक्षारक्षकांची संख्या, कागदोपत्री कमी आणि अस्तित्वात जास्त तसेच सूट दिलेल्या सुरक्षारक्षकांना नियमानुसार सुविधा, सिक्युरिटी एजन्सीकडून मिळतात का याची तपासणी होणे गरजेचे आहे.

# फुटपाथवर जाळी लावल्याने पादचाऱ्यांना होतोय त्रास

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

नवीन पनवेल शहरातील वेंगसरकर अकॅडमी समोरील फुटपाथवर पनवेल पालिकेने जाळी लावली असून त्याचा त्रास जाणायेणाऱ्या पादचाऱ्यांना होत आहे. त्यांना थेट रस्त्यावरून चालावे लागत आहे. त्यामुळे अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

नवीन पनवेल कडून सुकापुरकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला असणाऱ्या फुटपाथवर लोखंडी जाळी बसवण्यात आली. अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी ही लोखंडी जाळी काढण्यासाठी प्रयत्न केले मात्र पालिकेने अद्याप देखील ही लोखंडी जाळी काढलेली नाही. आदित्य जानोरकर यांनी देखील त्यासंदर्भात पालिकेला पत्रव्यवहार केला. मात्र लोखंडी जाळी जैसे थे आहे. फुटपाथ शिल्लक नसल्याने पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागत आहे. त्यामुळे अपघाताची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या ठिकाणी पादचाऱ्यांचा अपघात झाल्यास त्यास पालिका जबाबदार असेल, असे जानोरकर यांनी सांगितले.

# घर भाड्याने दिल्याने गुन्हा

**नवीन पनवेल :** परदेशी नागरिकाला घर भाड्याने देऊन सी फॉर्म न भरता त्याला बेकायदेशीररित्या राहण्यास मदत केल्याप्रकरणी अमित अशोक सिंग यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सानपाडा येथे राहणारे अमित अशोक सिंग यांनी नायजेरियन नागरिकाला शासनाच्या ऑनलाईन अधिकृत वेबसाईटवर सी फॉर्म न भरता त्याला निसर्ग कॉम्प्लेक्स, फरशीपाडा, खारघर येथील घर भाड्याने देऊन बेकायदेशीररित्या राहण्यास मदत केली.

# पावसाअभावी खरीप पेरण्या खोळंबल्या

## विहिरी कोरड्या, ग्रामीण भागात पाणीटंचाईचे संकट

**। उरण । प्रतिनिधी ।**

शेतीच्या खरीप हंगामातील पेरणीपूर्व मशागतीची कामे उरकली असून शेतकरी पेरणीयोग्य पावसाच्या प्रतीक्षेत आहे. जून महिना मध्यावर आला असतानादेखील पेरणीयोग्य पाऊस पडत नसल्यामुळे शेतकरी चिंतेत आहे.

उरण परिसरात मोठ्या प्रमाणात औद्योगिक आणि नागरी विकास होत असून त्यासाठी जमिनी संपादित झाल्या आहेत. मात्र तरीही येथे २,५०० हेक्टरपेक्षा अधिक जमिनीवर भात पिकाची लागवड होते. तर तालुक्यातील अनेक ठिकाणी शिल्लक जमिनीही कसल्या जात आहेत. मृग नक्षत्राची पेरणी खरीपासाठी उत्तम असते. त्यामुळे चांगला पाऊस मृग नक्षत्रात होईल. या आशेने शेतकऱ्यांनी महागडी बी बियाणे, खतांची जमवाजमव केली. शेतीची मशागत केली. मात्र पाऊस होत नसल्यामुळे पेरणी करावी की नाही हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. समजा कधीतरी बरसणाऱ्या सरींवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी पेरणी केलीच, तर बियाणे वाया जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

> **तीव्र उकाड्याने नागरिकही हैराण झालेले आहेत. कधी एकदा पाऊस पडेल याची शेतकऱ्यांसह नागरिक दररोज चातकासारखी वाट पाहात आहेत. पाऊस लांबल्याने यावर्षी पीक उशिराने येणार आहे. त्याचप्रमाणे लावण्याही लांबणार असल्याने आत्ताच ५० टक्के नुकसान झाले आहे.**
> **– महेश ठाकूर , शेतकरी**

# ज्येष्ठ नागरिकांसाठी स्मार्ट फोन प्रशिक्षण

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

ज्येष्ठ नागरिक संस्था रेवदंडा तालुका अलिबाग जिल्हा रायगड येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी स्मार्ट फोन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणामध्ये ज्येष्ठ नागरिक संस्थेतील एकूण पंचवीस ज्येष्ठ महिला पुरूष सहभागी झाले होते.

हे प्रशिक्षण इंटरनॅशनल लॉन्जेव्हीटी सेंटर इंडिया या संस्थेमार्फत घेण्यात आले व संस्थेकडून प्रशिक्षक म्हणून सुशांत सोनवणे, नंदकुमार सकट आणि विलास शिंदे उपस्थित होते.

दोन दिवसीय प्रशिक्षणामध्ये ज्येष्ठ नागरिकांना स्मार्ट फोनचा वापर, विविध ॲप्स, सोशल मीडियाचा वापर आणि सेल करणे तसेच स्मार्ट फोन कसं वापरावा दैनंदिन उपयोगी गोष्टी, मनोरंजन आणि उपयोगी माहिती कशी मिळवावी याचे प्रात्यक्षिक दाखवून प्रशिक्षण देण्यात आले.

दुसऱ्या दिवशीच्या सत्रात ज्येष्ठ नागरिकांची ऑनलाईन फसवणूक कशा प्रकारे केली जाते हे सांगितले. तसेच ऑनलाईन फसवणुकीच्या पद्धती, प्रकार आणि त्यातून होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले.

हा दोन दिवसीय कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला. यावेळी ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष यांचे मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष सरोज वरसोलकर, सचिव अलका देवधर, सहसचिव सुरेश खडपे, खजिनदार मंगेश वडके आणि सहखजिनदार प्रकाश पाटील उपस्थित होते.

हा कार्यक्रम संस्थेचा विरंगुळा केंद्रात पार पडला व संस्थेच्या सर्व सदस्यांनी सहकार्य केले. हे दोन दिवसीय प्रशिक्षण इंटरनॅशनल लॉन्जेव्हीटी सेंटर इंडिया आयोजित व घरडा केमिकल्स लि. प्रायोजित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश पाटील यांनी केले.

# सोन्याची चेन खेचून चोरी

नवीन पनवेल : पायी चालत जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील १२ ग्राम वजनाची सोन्याची चैन खेचून चोरटे मोटरसायकल वरून पळून गेले. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अंजू मोरे या खारघर येथे राहत असून त्या रात्री साई सिंफनी बिल्डिंग सेक्टर ३५, खारघर येथे पायी चालत जात होत्या. यावेळी दोन इसमानी त्यांच्या पाठीमागून काळया रंगाच्या मोटरसायकल वरून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून ते पळून गेले.

# राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

। रायगड । प्रतिनिधी ।

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार-२०२६ साठी ऑनलाइन स्व-नामांकन प्रक्रियेस प्रारंभ झाला असून राज्यातील पात्र शिक्षकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिक्षण संचालनालयाने केले आहे.

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी स्व-नामांकन प्रक्रिया सुरू झाली आहे. राज्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा तसेच मान्यताप्राप्त अनुदानित खाजगी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना या पुरस्कारासाठी अर्ज करता येणार आहे. पात्र शिक्षकांनी वेबपोर्टलवर स्व-नामांकन नोंदवावे. तसेच अर्जदारांनी आपले स्व-नामांकन अंतिम करून ऑनलाइन सादर करणे आवश्यक आहे. पात्र शिक्षकांनी राष्ट्रीय स्तरावरील या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी अर्ज करून आपल्या शैक्षणिक कार्याची दखल राष्ट्रीय पातळीवर घेण्याची संधी साधावी, असे आवाहन शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी केले आहे.

# पनवेल उपजिल्हा रुग्णालय हस्तांतरित करण्याची मागणी

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय हे पनवेल महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याची मागणी नगरसेवक डॉ. अरुणकुमार शंकर भगत यांनी केली आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये उपजिल्हा रुग्णालय असून हे रुग्णालय जिल्हा आरोग्य विभागाच्या कार्यकक्षेत येत आहे. या रुग्णालयात पुरेशी औषधे उपलब्ध नसतात. तसेच डॉक्टरांची संख्या अपुरी आहे. साफसफाईसाठी अत्यल्प कर्मचारी वर्ग असल्याने रुग्णालयाची साफसफाई वेळेवर होत नसल्याने स्वच्छतेचा प्रश्न उद्भवतो. तसेच रुग्णालयामध्ये आवश्यक असलेली उपकरणे उपलब्ध नसल्याने अत्यवस्थ रुग्णांवर उपचार करता येत नाही आणि अत्यंत महत्त्वाच्या शस्त्रक्रिया करता येत नाहीत. त्यामुळे उपजिल्हा रुग्णालय पनवेल महानगरपालिकडे हस्तांतरित केल्यास महानगरपालिकेकडून त्या ठिकाणी अद्ययावत सोयी उपलब्ध करून देणे शक्य होईल ,असे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत म्हणाले.

# आषाढी यात्रेसाठी एसटीच्या पाच हजार ५०० विशेष बसेस

**। रायगड । प्रतिनिधी ।**

पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या लाखो वारकऱ्यांच्या सेवेसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची एसटी यंदाही सज्ज झाली आहे. आषाढी एकादशी यात्रेनिमित्त राज्यभरातून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे जाणाऱ्या भाविकांच्या सुरक्षित, सुलभ आणि सुखकर प्रवासासाठी एसटी महामंडळाने ५ हजार ५०० विशेष बसेस सोडण्याचे नियोजन केले आहे.

राज्यातील कोणत्याही गावातून ४० किंवा त्यापेक्षा अधिक भाविकांनी एकत्रित मागणी केल्यास त्या गावातून थेट पंढरपूरसाठी विशेष एसटी बस उपलब्ध करून दिली जाणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

आषाढी यात्रेदरम्यान लाखो वारकरी पालख्यांसह पायी, रेल्वेने, खासगी वाहनांनी आणि एसटीने पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या भाविकांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत एसटी महामंडळाने व्यापक नियोजन केले आहे. भाविकांनी आपल्या जवळच्या एसटी आगाराशी संपर्क साधून विशेष बसची नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या विशेष बस सेवेतही शासनाच्या सर्व प्रवासी सवलती कायम राहणार आहेत. ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मअमृत ज्येष्ठ नागरिक योजनाफ अंतर्गत मोफत प्रवास, तर महिलांना ममहिला सन्मान योजनाफ अंतर्गत तिकीट दरात ५० टक्के सवलत दिली जाणार आहे.

मागील वर्षी आषाढी यात्रेसाठी एसटीने ५,२०० विशेष बसेस चालवून तब्बल २१ लाख ९५ हजार भाविकांची सुरक्षित ने-आण केली होती. यंदा त्याहून अधिक सक्षम नियोजन करण्यात आले आहे. वारीदरम्यान रात्रंदिवस सेवा बजावणारे चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्यासाठी मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्वखर्चाने चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था केली आहे. सुमारे १३ हजार कर्मचारी या सुविधेचा लाभ घेणार आहे. एकादशीच्या दिवशी लाखो भाविक परतीच्या प्रवासाला निघत असल्याने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी एसटीचे ३६ हून अधिक वाहतूक नियंत्रक आणि सुरक्षा रक्षक स्थानिक पोलीस प्रशासनासोबत कार्यरत राहणार आहेत. त्यामुळे वाहतूक नियोजन अधिक प्रभावी होऊन भाविकांचा प्रवास सुलभ होणार आहे. भाविकांची गर्दी लक्षात घेऊन पंढरपूर येथे चंद्रभागा, भीमा, विठ्ठल कारखाना आणि पांडुरंग अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागावमधील हॉटेलमध्ये** काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. ऑल राऊंडर कुक (कॉंटिनेंटल सुद्धा येणे आवश्यक) रेस्टॉरंट कॅप्टन, मेन्टेनन्स पर्सन, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबा. ७५५९१८४६१२
- **घरकामासाठी कायमस्वरूपी** राहून काम करणारी बाई हवी आहे. कामामध्ये जेवण बनवणे व घराची साफसफाई यांचा समावेश असेल. पगार : ₹ १५,०००/– राहण्यासाठी केयरटेकर रूम मिळेल. (फैमिली केयरटेकर रूम मध्ये राहू शकते.) इच्छुकांनी संपर्क साधावा. 7875866555
- **आर्किटेक्चर आणि इन्टेरियर** डिझाइनिंग ऑफिस करीता स्टाफ हवा आहे. संपर्क – 9762777975
- **वाडगाव फाटा येथे कॉटेज** सांभाळण्याकरीता माणूस हवा आहे. संपर्क – 9822938444
- **अलिबाग–मुरूड रोडटच चौल**–सागमळा (पिराचे देऊळ) येथे ८ गुंठा (१०.१०/७/१२) बागायत वाडी व उत्तम घर (क्लिअर टायटल) विकणे आहे. धंद्यासाठी सुद्धा उत्तम जागा आहे. संपर्क–घोसाळकर– ९८१९७७११११
- **रखवालदार/सफाईकामगार** पाहिजे संपर्क–८७८८०२१५१०
- **ड्रायव्हर पाहिजे** संपर्क – ९४२२६९४२०३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## समांतर बोगद्यांमुळे क्षमता व सुरक्षा वाढणार | वंदे भारतचे १६ डबे, चाकरमान्यांना दिलासा

# कोकण रेल्वेवर कोट्यवधींची विकासकामे

**। पनवेल । प्रतिनिधी।**

कोकण रेल्वे मार्गावरील प्रवासी सुविधा, सुरक्षा आणि वाहतूक क्षमता वाढविण्यासाठी कोकण रेल्वे प्रशासनाने तब्बल चार हजार ७०४ कोटी रुपयांच्या विकासकामांची घोषणा केली आहे. या महत्त्वाकांक्षी आराखड्यामुळे सिंधुदुर्गसह संपूर्ण कोकणातील रेल्वे प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

यात काही समांतर बोगदे, १५१ किलोमीटर रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण अशा कामांचा समावेश आहे. शिवाय गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई-गोवा वंदे भारत एक्स्प्रेस आठवरून १६ डब्यांची करण्याचा निर्णयही प्रशासनाने घेतल्याने चाकरमान्यांतून समाधान व्यक्त होत आहे. कोकण रेल्वे प्रशासनाने पत्रकाद्वारे याची माहिती दिली आहे. गणेशोत्सवात मुंबई, ठाणे आणि पुणे परिसरातून लाखोंच्या संख्येने चाकरमानी कोकणात दाखल होतात. त्यामुळे अतिरिक्त गाड्यांची मागणी सातत्याने होत होती. त्या पार्श्वभूमीवर रेल्वेने वंदे भारतचे डबे दुप्पट केले आहेत. त्यामुळे गणेशोत्सव काळात आरामदायी आणि जलद प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.




**काय होणार?**

वैभववाडी ते माजोर्डा (दक्षिण गोवा) दरम्यानच्या १५१ किलोमीटर रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण मये, नेवरा आणि मूकंबिका रोड-बायंदूर येथे नवीन क्रॉसिंग स्थानके मडुरे ते पेडणे (गोवा) बोगद्याशेजारी तब्बल ९९४ कोटी खर्चून तसेच ओल्ड गोवा बोगद्याशेजारी ४९२ कोटी खर्चून समांतर बोगदे जुन्या रुळांच्या नूतनीकरणासाठी ३६३ कोटींची तरतूद मडगाव-लोलये आणि शिरूर-उडुपी दरम्यानच्या सुमारे १२० किलोमीटर मार्गावरील रुळ बदलणार संपूर्ण मार्गावर ९९८ कोटीं खर्चून कवच ही स्वयंचलित ट्रेन संरक्षण यंत्रणा उभारणार आहे.

# अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक

**नवीन पनवेल :** अज्ञात वाहनाने रोडपाली सिग्नलवर दुचाकीला दिलेल्या धडकेत एकाचा मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी अज्ञात वाहन चालका विरोधात १९ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. १९ जून रोजी दुपारी दोनच्या सुमारास किशनमोहन सुबोध झा (वय ३१) हा दुचाकीवरून प्रवास करत होता. तो रोडपाली सिग्नल पनवेल मुंब्रा वाहिनीवर रोडपाली येथे आला असता अज्ञात वाहन चालकाने त्याच्या दुचाकीला ठोकर मारली. यात किशनमोहन गंभीर जखमी झाला आणि त्याचा मृत्यू झाला.

# विद्यामंदिरची इमारत बनतेय डम्पिंग झोन

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**



पोलादपूर नगरपंचायतीने उत्तर वाहिनी सावित्री नदी पात्रालगतच्या स्मशानभूमीजवळ पहिल्या पंचवार्षिक कालावधीत डम्पिंग झोन तयार केल्यानंतर हरित लवादाने ७ लाखांचा दंड ठोठावला. दुसऱ्या पंचवार्षिक कालावधीत चोळई आणि सावित्री नदीच्या संगमावर डम्पिंग झोन तयार केल्यानंतर राष्ट्रीय हरित लवादाने नोटीस बजावली आहे.

यामुळे नगरपंचायतीची इमारत प्रस्तावित असलेल्या विद्यामंदिर पोलादपूरच्या एसटी स्थानकालगतच्या जुन्या जीर्ण इमारतींमधील क्रीडांगणावर दोन खड्डे खोदून कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रयत्न सुरू केला आहे. यामुळेच जुन्या जमान्यातील गीतकार साहिर लुधियानवयीची कल जहाँ बसती ती खुशियाँ.. आज है मातम् वहाँ..वक्त लाया था फिजायें.. वक्त लाया है खिज़ा.. ही रचना अनेकांना आठवली आहे.

विद्यामंदिर पोलादपूरच्या एसटी स्थानकालगतच्या इमारतीची पडझड सुरू झाली आणि विद्यामंदिर स्थलांतरित करण्याचे वेध लागले. सद्यस्थितीत रयत शिक्षण संस्थेच्या विद्यामंदिर पोलादपूरची नवीन इमारत एम्पथी फाउंडेशनच्या माध्यमातून ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ देवस्थानजवळ उभारण्यात येऊन तिथे शिशूवर्गापासून बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात आहे. त्यामुळे विद्यामंदिर पोलादपूरच्या एसटी स्थानकालगतच्या इमारती पाडून पोलादपूर नगरपंचायत कार्यालयाची इमारत उभारण्याचे प्रस्तावित करण्यात आले. काही नगरसेवकांनी अहमहमिका केल्याने प्रस्तावित निधी परत गेला असून नियोजित इमारत बारगळली आहे. अशातच, गेल्या काही वर्षांपासून नगरपंचायत पोलादपूरला शहरातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाअभावामुळे हरित लवादाने ठोठावलेला दंड आणि नोटिसांमुळे नगरपंचायत प्रशासन सैरभैर झाले आहे.

आमची माती आमची माणसं सामाजिक संघटनेने देखील याप्रश्नी आंदोलन केले आणि पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचाने तसेच विरोधी गटाच्या नगरसेवकांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी मंत्री भरत गोगावले यांनी रानबाजिरे धरणाजवळच्या मोकळ्या जागेत चोळई आणि सावित्री नदीच्या संगमावरील डम्पिंग झोन नेण्याची घोषणा स्पीकर फोनवरून ऐकवली. मात्र, प्रत्यक्षात नगरपंचायत पोलादपूरने रयत शिक्षण संस्था सातारा संचालित विद्यामंदिर पोलादपूरच्या जीर्ण व रिकाम्या इमारतींमधील मोकळ्या जागेत दोन खड्डे खणून शहरातील कचरा प्रायोगिक तत्त्वावर आणून खड्ड्यांमध्ये जाळण्यास सुरूवात केली आहे. याबद्दल कोणतेही अधिकारी अथवा नगरसेवकांनी पत्रकारांनी केलेल्या भ्रमणध्वनीवरून संपर्काला प्रतिसादही दिला नाही.

पोलादपूर भूमी अभिलेख उपअधीक्षक कार्यालय २००५ मध्ये भिजलेल्या धान्य गोदामातील तांदूळ व गव्हाची विल्हेवाट लावण्यासाठी खणलेल्या खड्ड्यावर उभारण्यात आल्याने सदरची इमारत थोडीशी तिरकी झाली आहे. आता कचरा खड्ड्यांमध्ये जाळून नष्ट केल्यानंतर त्यावर नगरपंचायत पोलादपूर कार्यालयाची इमारत बांधण्यात आली तर भविष्यात ती इमारत देखील कलण्याची शक्यता निर्माण होऊन इमारती प्रमाणे नगरपंचायतीचा कारभार देखील डळमळीत होणार असल्याची चिन्हे दिसत आहेत.

नगरपंचायत पोलादपूरच्या प्रशासनाने विद्यामंदिर पोलादपूरच्या जीर्ण इमारतीच्या आवारात सुरू केलेल्या कचरा विल्हेवाट प्रकारामुळे माजी विद्यार्थ्यांचा रोष ओढवून घेतला असून नजीकच्या काळात नगरपंचायतीच्या तिसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीला सत्ताधारी आणि विरोधक सामोरे जाणार असल्याने हा मुद्दा भावनिक स्वरुपात उपस्थित झाल्यास मोठ्या प्रमाणात विरोधाला सामोरे जावे लागणार आहे.

# आयुष हॉस्पिटलमध्ये यशस्वी शस्त्रक्रिया

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**



नांदगावच्या आयुष हॉस्पिटलमध्ये १० वर्षीय बालकाच्या हाताच्या फ्रॅक्चरवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. सदर बालकाला हाताला गंभीर दुखापत झाल्यानंतर उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते.

अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.प्रतिक गुंडरे व डॉ.हिरालाल आणि त्यांच्या टीमने तालुक्यातील काशिद ग्रामपंचायत हद्दीतील सर्वे गावातील कुमार ओम् उमेश कदम या दहा वर्षिय बालकाच्या हातावर यशस्वीपणे शस्त्रक्रिया करण्यात आली.विशेष बाब म्हणजे ही शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अंतर्गत पूर्णपणे मोफत करण्यात आली. त्यामुळे रुग्णाच्या कुटुंबाला कोणताही आर्थिक भार सहन करावा लागला नाही. शस्त्रक्रियेनंतर बालकाची प्रकृती स्थिर असून त्याची प्रकृती सुधारत असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली. ग्रामीण भागातील रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा व तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपचार मिळावेत यासाठी आयुष हॉस्पिटल सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

# नांदगाव येथे शैक्षणिक साहित्य वाटप

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**



संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात शनिवार ता. २० रोजी साईक्स अँड रे इक्विटीज इं. लि. यांच्या वतीने गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून साईक्स ॲन्ड रे कंपनीचे डायरेक्टर अनुप गुप्ता, डायरेक्टर सुधीर मराठे व मॅनेजर राजेश अग्रवाल उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. विद्यालयाचे प्राचार्य अशोक शिंदे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमामागची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी कंपनीने दाखवलेली सामाजिक बांधिलकी कौतुकास्पद आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे अनुप गुप्ता व सुधीर मराठे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात विद्यार्थ्यांना वह्या, इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचा शाळेतील गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना लाभ झाला.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अनुप गुप्ता म्हणाले शिक्षण हेच खरे धन आहे.आजचे विद्यार्थी उद्याचे नागरिक आहेत.याचा विचार करून परिस्थितीवर मात करून जिद्दीने अभ्यास करा. आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. सुधीर मराठे यांनीही विद्यार्थ्यांना कष्टाचे महत्त्व पटवून देत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भूषण सुतार यांनी केले तर आभार प्रदर्शन महेंद्र निकुंभ यांनी मानले. या कार्यक्रमासाठी प्राचार्य अशोक शिंदे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डिजिटल क्लासरूमचे उद्‍घाटन संपन्न

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

अंजुमन इस्लाम जंजिरा प्राथमिक उर्दू शाळा, मुरुड जंजिरा येथे नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी डिजिटल क्लासरूमची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. या डिजिटल क्लासरूमचे उद्‍घाटन आयटीआय मुरुडचे चेअरमन समीर झहीर दौनाक यांच्या हस्ते करण्यात आले. या डिजिटल क्लासरूमसाठी तौसिफ इस्माईल फत्ते यांनी विशेष प्रयत्न घेतले असून, त्यांच्या योगदानामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शिक्षण घेण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

या कार्यक्रमात संस्थेचे सचिव हिफझूररेहमान नझीरी, हायस्कूल चेअरमन अब्दुलरहीम कबले, शाळेच्या मुख्याध्यापिका रक्षणदा खतीब, डिग्री कॉलेज चे प्राचार्य डॉ. साजिद शेख, हायस्कूल व जुनिअर कॉलेज चे प्राचार्य वसीम सातारेकर, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती. विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. नवीन वातावरण, डिजिटल सुविधा आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

शाळा व्यवस्थापनाने सांगितले की, डिजिटल क्लासरूममुळे विद्यार्थ्यांची शिकण्याची आवड वाढेल व शिक्षण अधिक प्रभावी आणि आकर्षक होईल. नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात प्रेरणादायी ठरली असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

# लोहप ब्रिज मार्गावरील पडलेले खड्डे भरले

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**



चौकलोहप मार्गावरील रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात आले असले तरी लोहप ते ब्रिज दरम्यानच्या रस्त्यावर गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते.त्यामुळे वाहनचालकांना वाहन चालवताना मोठी कसरत करावी लागत होती. विशेष म्हणजे दरवर्षी पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी जमा होत असल्याने अपघातांचा धोका त्या प्रमाणात संभवत होता.मात्र हे बाब निदर्शनास येतात पाऊस सुरू होण्या अगोदरच तातडीने या ठिकाणी खड्डे भरण्यात आल्यामुळे प्रवासी वर्गाने व वाहन चालकाने समाधान व्यक्त केले आहे.तसेच या ठिकाणी खड्डे भरण्याचे काम सुरू असल्याचे पहावयास मिळत आहे.

रस्त्यावर पडलेले खड्डे ही गंभीर बाब उत्तम भोईर यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी जिल्हा परिषद सदस्य तथा गटनेते संतोष बैलमारे यांच्याकडे पाठपुरावा केला. सदर या ठिकाणी पडलेले खड्डे तातडीने भरून नागरिकांचा प्रवास सुरक्षित व सुखकर करण्याची मागणी त्यांनी केली होती.या मागणीची दखल घेत संतोष बैलमारे यांनी संबंधित यंत्रणेशी समन्वय साधून लोहपब्रिज मार्गावरील खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण करून घेतले. त्यामुळे या मार्गावरील वाहनचालक व नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. यापूर्वी पावसाळ्यात खड्ड्यामध्ये पाणी साचल्यामुळे खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने अपघात घडत होते.आता खड्डे भरण्यात आल्याने अपघातांची शक्यता कमी झाली असून वाहनचालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.नागरिकांनी जिल्हा परिषद सदस्य संतोष बैलमारे व उत्तम भोईर यांच्या प्रयत्नांचे स्वागत करत आभार व्यक्त केले आहेत.

# प्रभाकर पाटील यांचे निधन

**पाताळगंगा :** प्रभाकर पाटील यांचे मंगळवारी (दि.१६) निधन झाले. ते वयाच्या ६९ वर्षाचे होते. त्यांच्या अंत्यविधीस सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आशा विविध स्तरातील मान्यवर त्यांचे अंत्य दर्शन घेण्यासाठी उपस्थित होते.



त्यांचे दशक्रिया विधी, गुरूवारी (दि.२५) श्रीक्षेत्र उध्दर रामेश्वर येथे होणार आहे.तसेच त्यांचे उत्तरकार्य रविवारी (दि.२८) निवास स्थानी होणार असून या निमित्ताने रामदास पाटील खोपोली यांचे सकाळी १० वाजता प्रवचन होणारा आहे.त्यांच्या पश्चात त्यांचा मुलगा किरण, रूपेश, मुली, बहिणी, सुना, नातवंडे, पंतवडे, जावई, असा मोठा परिवार आहे.

# कळंबोली परिसरातील अनधिकृत अतिक्रमणांवर पालिकेची कारवाई

**। कळंबोली । प्रतिनिधी।**



पनवेल महानगरपालिका हद्दीतील कळंबोली परिसरात अनधिकृत अतिक्रमणांविरोधात विशेष मोहीम राबवून कारवाई करण्यात आली. आयुक्त मंगेश चितळेयांच्यासूचनेनुसार अतिक्रमण पथकाने अनधिकृत झोपड्या, टपऱ्या तसेच फेरीवाल्यांवर कारवाई करत सार्वजनिक जागा मोकळ्या केल्या.

अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे व उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. यामध्ये कळंबोली येथील डिमार्ट परिसर, बस डेपो तसेच सेक्टर १४, १७ आणि २० या भागांतील अतिक्रमणे हटविण्यात आली. रस्ते व सार्वजनिक जागांवर उभारण्यात आलेल्या अनधिकृत झोपड्या, टपऱ्या आणि इतर अडथळे दूर करण्यात आल्याने वाहतुकीला होणारा अडथळा कमी झाला असून नागरिकांच्या सोयीसुविधांमध्ये सुधारणा झाली आहे.

या कारवाईदरम्यान सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, प्रभारी अधीक्षक अरविंद पाटील, कळंबोली पोलीस ठाण्याचा कर्मचारीवर्ग, सुरक्षा रक्षक तसेच अतिक्रमण पथकाचे कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिकेने शहरातील सार्वजनिक जागांवरील अनधिकृत अतिक्रमणांविरोधात भविष्यातही नियमित आणि कठोर कारवाई सुरू ठेवण्याचा इशारा दिला असून नागरिकांनी नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# म्हसळा पोलिसांची धडाकेबाज कारवाई

## अर्धा किलो गांजासोबत दोघांना अटक



**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यात गांज्याची वाहतूक करणाऱ्या २ जणांचे पोलिसांनी मुसक्या अवळ्या असून त्यांच्याकडून ५५१ ग्रॅम गांज्यासहित १ लाख ४० हजार ५०० रुपयांच्या मुद्देमाल हस्तगत केला आहे.

अटक केलेले आरोपी अल्ताफ शकील मेमन व जिशान हसनमिया शेख हे पनवेल येथे राहत असून, रात्रीच्या वेळेस हे दोघे रिक्षा मधून म्हसळा शहरात गांजा घेऊन येणार असल्याची विश्वासनिय खबर पोलिसांना मिळाली होती.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

# शालोपयोगी वस्तू खरेदीसाठी गर्दी




**उरण :** शाळा व कॉलेज सुरु झाल्याने वह्या पुस्तके खरेदी करण्यासाठी उरण शहरातील बुक स्टोल वर विद्यार्थी व पालकांनी गर्दी केली होतीशाळा कॉलेज सुरु झाले अंन वह्या पुस्तके शालोपयोगी वस्तू घेण्यासाठी सायंकाळी खूपच गर्दी असतें असे मिलन बुक स्टोअर्सचे मालक परबत मेर यांनी सांगितले

# बाळाराम राऊत यांचे निधन

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

मोहोपाडा येथील बाळाराम मारुती राऊत यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा मृत्यू झाल्याची बातमी समजताच रसायनी पाताळगंगा परिसरातील जनसमुदाय निवासस्थानी हजर झाले.त्यांच्यावर मोहोपाडा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांना सर्वजण आप्पा नावाने ओळखत. मोहोपाडा गावात कोणताही गावकीचा विषय असल्यास तंटा सोडविण्यासाठी आप्पा नेहमी सक्रीय असायचे. त्यांचा दशक्रिया विधी बुधवार दि.२८ जून रोजी श्री क्षेत्र गुळसुंदे येथे होणार आहे.तर उत्तर कार्य १ जुलै रोजी मोहोपाडा येथील निवासस्थानी होणार आहे.रोज सायंकाळी ६:३० वाजता गरुड पुराण वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.तर २८ जून ते ३० जून पर्यंत रात्री भजनाचा कार्यक्रम होणार आहे.

उत्तरकार्य दिनी सकाळी वामन भोईर यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम होणार आहे.कै.बाळाराम राऊत यांचा स्वभाव प्रेमच होता.

ते नेहमी सर्वांना हवेहवेसे वाटायचे.त्यांच्या अचानक जाण्याने राऊत कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# दिव्यांग रोजगार मेळाव्याचे आयोजन

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**



दिव्यांगांसाठी शासनाच्या ज्या ज्या योजना असतील. त्या त्या योजना पंचायत समितीच्या मार्फत दिव्यांग्यांपर्यंत पोहोचविण्याचा मी प्रामाणिकपणे प्रयत्न करीन. अर्थात दिव्यांग्यांच्या सेवेस मी सदैव तत्पर राहीन असा विश्वास उरण पंचायत समितीच्या सदस्या कविता पाटील यांनी व्यक्त केला.

उरण पूर्व विभागातील कोप्रोली येथे दिव्यांग रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलत होत्या. आई फाउंडेशन आणि डॉ. रेडिस फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हा रोजगार मेळावा भरवण्यात आला होता. आई फाउंडेशनच्या वतीने गेली पाच वर्षे ३० डिसेंबर हा जागतिक दिव्यांग दिन साजरा केला जात असल्याचे अध्यक्ष मदन पाटील यांनी सांगितले.

माजी आमदार मनोहर भोईर यांच्याकडून दिव्यांगांना पेन्शन मदत केली जाते. त्याचबरोबर पंचायत समिती योजना सुद्धा सर्व दिव्यांगपर्यंत पोहोचवल्या पाहिजेत. असेही मदन पाटील यांनी सांगितले.डॉ. गौतम कोळी यांनी स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रत्येक दिव्यांगाला रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे. किमान दहा पैकी आठ तरी दिव्यांगांना कोणत्या ना कोणत्या तरी नोकरीत समाविष्ट करून घेतले पाहिजे असे सांगितले. यावेळी व्यासपीठावर डॉ. कोळी, उरण पंचायत समिती सदस्या कविता पाटील, डॉ .पर्जन्य म्हात्रे, उपसरपंच विपुल म्हात्रे, पत्रकार तुलसीदास पाटील, सरपंच गणेश म्हात्रे, डॉ. मंदार, डॉ. संजना गोंडे, नाट्यकर्मी अशोक म्हात्रे, समालोचक सुनील वर्तक, मदन पाटील यांच्यासह शेकडो दिव्यांग उपस्थित होते.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

तिघांचे बळी घेतल्यानंतर एमएमआरडीएला जाग | स्थानिकांच्या मागणीला आले यश

# कर्जत-चौक राज्यमार्गावर बसवला गतिरोधक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत-चौक रस्त्यावर आठ किलोमीटर अंतराच्या प्रवासात कुठेही गतिरोधक नाही आणि त्यामुळे वाहने सुसाट प्रवास करतात.या सुसाट प्रवासात वाहनांचा वेग वाढतो आणि वाहनांचे अपघात घडतात.या रस्त्याने मागील आठ दिवसात कर्जत तालुक्यातील रस्ते अपघातात तिघांचे बळी घेतले आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या प्रशासनाला जाग आली असून आज गतिरोधक टाकण्यास सुरुवात झाली आहे. स्थानिक रहिवाशी कार्यकर्ते आणि माहिती अधिकार कार्यकर्ते यांनी जोरदार आवाज उठवल्यावर प्राधिकरणाला जाग आली आहे.

कर्जत-चौक मार्गावर मागील काही दिवसांत अनेक गंभीर अपघात घडले असून त्यामध्ये कर्जत तालुक्यातील तिघांचे बळी गेले आहेत. सदर रस्ता नव्याने विकसित करण्यात आलेला असूनही सुरक्षित वाहतुकीसाठी आवश्यक असलेल्या अनेक मूलभूत बाबींचा अभाव आढळून येतो. रस्त्याच्या अनेक भागांमध्ये सुरक्षित प्रवासासाठी साईड पट्टे उपलब्ध नाहीत.हा रस्ता बांधून पूर्ण करणे हीच जबाबदारी एमएमआरडीएची दिसून आली आहे. संबंधित यंत्रणा, सल्लागार संस्था व ठेकेदार यांची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र या मार्गावर सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात झालेल्या दुर्लक्षामुळे निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. अपघातप्रवण ठिकाणांची ओळख करून तातडीने सुधारणा करण्यात यावी अशी मागणी मुख्यमंत्री आपले सरकार पोर्टलवर करण्यात आली आहे. सचिन गायकवाड यांनी त्याबाबत प्राधिकरणाकडून काही अपेक्षा केल्या आहेत. त्यात रस्त्यावर आवश्यक त्या सर्व ठिकाणी साईड पट्टे, दिशादर्शक फलक, चेतावणी फलक, रेडियम रिफ्लेक्टर, कॅट- कॅट-आय व इतर सुरक्षा साधने बसविण्यात यावीत. रस्त्याच्या रचना, अंमलबजावणी आणि सुरक्षा मानकांबाबत संबंधित ठेकेदार आणि इतर सुरक्षा सल्लागार संस्था व जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात यावी, अशा मागण्या केल्या आहेत.

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

जाहीर निवेदन

जा.क्र. अअ/अउदा/संवसु/मंडल/पनवेल/मासं/१३८८ दिनांक १९.०६.२०२६

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून विजतंत्री या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांना सूचित करण्यात येते की, अउदा. संवसु. मंडल, पनवेल अंतर्गत वर्ष २०२६-२७ करिता शिकाऊ उमेदवारांना एक वर्ष कालावधीसाठी करारबद्ध करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी http://apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर शिकाऊ उमेदवारीकरिता दिनांक २२.०६.२०२६ (००.०० तासापासून) ते १०.०७.२०२६ (२४.००) वाजेपर्यंत आस्थापना नोंदणी क्रमांकावर ऑनलाईन अर्ज करावे. आस्थापना नोंदणी क्रमांक व शिकाऊ उमेदवारी पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहेत.

| अनु.क्र. | नांव | आस्थापना नोंदणी क्र. | विजतंत्री |
|---|---|---|---|
| १ | M.S.E.T.C.L. EHV O&M Circle, Panvel | E09162700835 | ७७ |

२. शैक्षणिक अर्हता, उमेदवारांनी सादर करावयाचे दस्तावेज, विद्यावेतन तसेच इतर अटी व शर्तींच्या माहितीसाठी कंपनीच्या www.mahatransco.in या संकेतस्थळावर ''ताज्या बातम्या आणि अद्यतने'' (Latest News & Updates) या सदराखाली प्रसिद्ध करण्यात आलेली सूचना पाहावी.

सही/-
अधीक्षक अभियंता, अउदा. संवसु. मंडल, पनवेल

# भारताचा तिरंगी मालिकेवर कब्जा

## ।। श्रीलंकेला ६६ धावांनी पराभवाचा धक्का ।। वैभव सूर्यवंशीसह यश ठाकूरचा मोलाचा वाटा

**। डंबुला । वृत्तसंस्था ।**

भारतीय 'अ' संघाने तिलक वर्माच्या नेतृत्वातील रविवारी (दि.२१) तिरंगी एकदिवसीय मालिकेचे विजेतेपद जिंकले आहे. डंबुलाला झालेल्या अंतिम सामन्यात भारत 'अ' संघाने श्रीलंका 'अ' संघाला ६६ धावांनी पराभवाचा धक्का दिला. त्यामुळे भारताने विजेतेपदाच्या चषकावर आपले नाव कोरले आहे. भारताच्या या विजयात वैभव सूर्यवंशीसह यश ठाकूरने मोलाचा वाटा उचलला.



या सामन्यात प्रथम फलंदाजीला उतरलेल्या भारतीय संघाकडून १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने सुरुवातीलाच आक्रमक फलंदाजी करत श्रीलंकेच्या गोलंदाजांना दबावात टाकले. त्याने अवघ्या ११ चेंडूत अर्धशतक करत "लिस्ट ए" क्रिकेटमध्ये सर्वात जलद अर्धशतक करण्याचा विश्वविक्रम केला आहे. त्याने २९ चेंडूत १० चौकार आणि ८ षटकारांसह ९४ धावांची खेळी केली. त्याशिवाय कर्णधार तिलक वर्माने ९० चेंडूत ६७ धावांची खेळी केली. तसेच, ऋतुराज गायकवाडने ४० धावांची खेळी केली. याशिवाय प्रियांश आर्य (३९), कुमार कुशाग्र (३६) आणि अनुकूल रॉय (३९) यांनी छोटेखानी पण महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यामुळे भारताने ५० षटकात ९ बाद ३७७ धावा केल्या. यावेळी श्रीलंकेकडून कुगाथास मथुलन, रविंदू फर्नांडो, वानुजा सहान यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. तर, मोहम्मद शिराज, सहान अराच्चिगे आणि दुलज समुदिथा यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

त्यानंतर ३७८ धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या श्रीलंकेला सुरुवातीलाच यश ठाकूरने मोठे धक्के दिले. त्याने तिसऱ्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर अविष्का फर्नांडो (३) याला बाद केले. त्यानंतर निरोशान डिकवेल्ला आक्रमक खेळत होता, मात्र त्याचाही अडथळा ५ व्या षटकात यश ठाकूरनेच दूर केला. त्याने त्याला २५ धावांवर असताना त्रिफळाचीत केले. १०व्या षटकात नुवानीदू फर्नांडोलाही यश ठाकूरनेच बाद केले. त्यामुळे ७५ धावांवरच श्रीलंकेने ३ गडी गमावले होते. मात्र, त्यानंतर सदिरा समरविक्रमा आणि कर्णधार सहान अराच्चिगे यांनी अर्धशतकी भागीदारी करत संघाता डाव सावरला. परंतु, १८ व्या षटकात त्यांची ५३ धावांची भागीदारी अशोक शर्माने तोडली. त्याने अर्धशतक केलेल्या समरविक्रम (५२) याला कुमार कुशाग्रच्या हातून झेलबाद केले. त्यानंतर २१ व्या षटकात लगेचच विपराज निगमने रविंदू फर्नांडोलाही १९ धावांवर माघरी धाडले. त्यानंतर अराच्चिगेला ३८ धावांवर तिलक वर्माने बाद केले. मात्र, त्यानंतर वनुजा सहानला विजयकांत वियासकांताची साथ मिळाली. या दोघांनी ७७ धावांची भागीदारी करत संघाच्या आशा जिवंत ठेवल्या होत्या. त्यांची भागीदारी ३७ व्या षटकात अनुकूल रॉयने तोडली. त्याने विजयकांतला ३९ धावांवर माघारी धाडले. तरी मोहम्मद शिराज वानुजाला साथ देत होता. वानुजाने अर्धशतकही केले होते. अखेर त्याचाच अडथळा विपराज निगमने ४२ व्या षटकात दूर केला. त्याला ६२ धावांवर झेलबाद केले. अखेरीस दुलाज समुदिताला १५ धावांवर अनुकूल रॉयने, तर शिराजल ४८ व्या षटकात विपराज निगमने २१ धावांवर बाद केले आणि श्रीलंकेचा डाव संपवला. यावेळी भारताकडून यश ठाकूर आणि विपराज निगम यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले. कूल रॉयने २ बळी घेतले. तर, अशोक शर्मा व कर्णधार तिलक वर्मा यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

### 'बेबी बॉस'ची धडाकेबाज खेळी

'बेबी बॉस' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वैभव सूर्यवंशीने श्रीलंका 'अ' विरुद्धच्या तिरंगी मालिकेच्या अंतिम सामन्यात आपल्या जबरदस्त फलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्याने केवळ २९ चेंडूत ९४ धावांची धडाकेबाज खेळी केली. त्याचे जरी अवघ्या सहा धावांनी शतक हुकले असले, तरी त्याच्या आक्रमक खेळाने सामन्याचे चित्र पूर्णपणे बदलून टाकले. या खेळीदरम्यान वैभवने १० चौकार आणि ८ षटकारांची आतषबाजी केली. विशेष म्हणजे, त्याने अवघ्या ११ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले आणि 'लिस्ट-ए' क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात जलद अर्धशतकाचा विक्रम प्रस्थापित केला. वैभवच्या फलंदाजीची ताकद यावरून दिसून येते की, त्याने आपल्या सुरुवातीच्या ६४ धावा केवळ चौकार आणि षटकारांच्या मदतीने केल्या होत्या; त्याची ६५ वी धाव 'सिंगल' होती.



## निवडक

### रेयांश बनेची सुवर्ण हॅट्ट्रिक

**न्यूयॉर्क** : रांची : झारखंडची राजधानी रांची येथे पार पडलेल्या १२ व्या अखिल भारतीय रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत महाराष्ट्राच्या युवा स्केटरने नवा इतिहास रचला आहे. नवी मुंबईत राहणाऱ्या अवघ्या १० वर्षांच्या रेयांश बने याने राष्ट्रीय स्तरावर अभूतपूर्व कामगिरी करत सलग तीन दिवस तीन सुवर्णपदके पटकावली आहेत. त्याच्या या देदिप्यमान यशामुळे महाराष्ट्राच्या क्रीडाक्षेत्रात आनंदाचे वातावरण असून, तो राज्याचा एक उदयोन्मुख तारा म्हणून समोर आला आहे. रोलर स्केटिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने ९ ते १२ वयोगटासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून केवळ दोनच खेळाडूंची निवड झाली होती, ज्यामध्ये रेयांशचा समावेश होता. रांची येथे दि.१६, १८ आणि २० जून रोजी झालेल्या या स्पर्धेत रेयांशने आपल्या अफाट वेगाच्या आणि कौशल्याच्या जोरावर विरोधकांना थक्क केले. त्याने रोल लॅप, १०० मीटर आणि ५०० मीटर अशा तिन्ही प्रकारांत सलग तीन सुवर्णपदके जिंकून सुवर्ण हॅट्ट्रिक साधली.

### इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघ जाहीर



**नवी दिल्ली** : भारतीय क्रिकेट संघ जुलैमध्ये इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यात भारताला ५ सामन्यांची टी-२० मालिका आणि ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळायची आहे. टी-२० मालिकेसाठी यापूर्वीच संघाची घोषणा झाली आहे, तर एक दिवसीय मालिकेसाठी रविवारी (दि.२१) बीसीसीआयच्या निवड समितीने भारतीय संघ घोषित केला आहे. या मालिकेसाठी शुभमन गिल कर्णधार असून, श्रेयस अय्यर उपकर्णधार असणार आहे. ईशान किशन आणि केएल राहुल हे यष्टीरक्षणासाठी पर्याय असणार आहेत. याशिवाय नुकतेच शनिवारी अफगाणिस्तानविरुद्ध झालेल्या सामन्यात शतक करणाऱ्या यशस्वी जैस्वालला मात्र संघातून वगळण्यात आले आहे. आता विराट कोहलीची इंग्लंड दौऱ्यासाठी निवड झाली असल्याने जैस्वालला वगळण्यात आले आहे. तसेच, जसप्रीत बुमराह, हर्षित राणा यांचेही पुनरागमन झाले आहे. दरम्यान, विराट कोहलीचा सहभाग त्याच्या फिटनेसवर अवलंबून असेल, असंही बीसीसीआयने स्पष्ट केले आहे. त्यामुळे आधी त्याला त्याची फिटनेस टेस्ट उत्तीर्ण करावी लागणार आहे. इंग्लंड दौऱ्यासाठी जाणाऱ्या भारतीय एकदिवसीय संघात शुभमन गिल (कर्णधार), रोहित शर्मा, विराट कोहली, श्रेयस अय्यर (उपकर्णधार), केएल राहुल (यष्टीरक्षक), ईशान किशन (यष्टीरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, अक्षर पटेल, नितीश कुमार रेड्डी, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, प्रसिद्ध कृष्णा, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, गुरनूर ब्रार यांचा समावेश आहे.

### यजमानांची विजयी घोडदौड सुरूच

**सीटल** : सहयजमान अमेरिकेने लागोपाठ दुसरा सामना जिंकून विश्वकरंडक स्पर्धेच्या 'ड' गटातून बाद फेरी पक्की केली आहे. विजयी घोडदौड राखताना त्यांनी ऑस्ट्रेलियाला २-० फरकाने नमविले. अगोदरच्या लढतीत पॅराग्वेचा ४-१ असा फडशा पाडलेल्या अमेरिकन संघाचे सहा गुण झाले, तर ऑस्ट्रेलियाचे तीन गुण कायम राहिले आहेत. त्यांनी पहिल्या लढतीत तुर्किएला २ गोलने पराभूत केले होते. पुढील फेरी गाठण्यासाठी ऑस्ट्रेलियन संघाला पॅराग्वेविरुद्ध



जिंकावेच लागणार आहे. तसेच, अमेरिकेचा अखेरचा गटसाखळी सामना तुर्किएविरुद्ध होणार आहे.अमेरिकेला सामन्याच्या ११व्या मिनिटास आघाडी मिळाली. अमेरिकेच्या फोलॅरिन बॅलोगन याच्या क्रॉस पासवर कॅमेरून बर्गेस याने चेंडू स्वतःच्याच गोलनेटमध्ये मारला. नंतर ४३व्या मिनिटास ॲलेक्स फ्रीमन याने अगदी जवळून साधलेल्या हेडिंगवर अमेरिकेची आघाडी वाढली. लाईनमनने या वेळी ऑफसाइडची खूण केल्यानंतर गोल वैधतेसाठी रेफरीने व्हीएआर तंत्रज्ञानाची मदत घेतली आणि त्यात सर्जिओ डेस्ट याच्या असिस्टवरील फ्रीमनच्या हेडिंग गोलवर शिक्कामोर्तब झाले. पोटरीचा स्नायू दुखावल्यामुळे प्रमुख खेळाडू ख्रिस्तियन पुलिसिक याच्याविना अमेरिकेचा संघ मैदानात उतरला होता, तरीही त्यांनी विजयास गवसणी घातली. शानदार खेळ केलेला फोलॅरिन बॅलोगन सामन्याचा मानकरी ठरला.

## पंच प्रशिक्षण शिबिराचे आयोजन



**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा क्रिकेट असो. च्यावतीने रविवारी (दि.२१) पेण येथील भाऊसाहेब नेने प्रायव्हेट हायस्कूल येथे जिल्हास्तरीय पंच प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रशिक्षण शिबिरासाठी मार्गदर्शक म्हणून माजी रणजीपटू व विध्याम बीसीसीआयचे हर्षद रावले, रुपेश खडगी, मुंबई क्रिकेट असो.चे पंच राजन कसबे व क्रिकेट नियमांचे तज्ज्ञ नयन कट्टा उपस्थित होते. हे प्रशिक्षण एमसीएच्या पंच परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी घेण्यात आले होते. यावेळी रायगड जिल्ह्यातील २५ परीक्षार्थींनी शिबिरासाठी उपस्थिती लावली असून, शिबिरामध्ये एमसीसी क्रिकेट लॉ नुसार मार्गदर्शन करण्यात आले.रायगड जिल्हा क्रिकेट असो. चे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, गेल्या दोन वर्षांत आरडीसीए तर्फे सर्व वयोगटातील पुरुष व महिला प्रीमियर लीग तसेच एमसीए इन्व्हिटेशन स्पर्धेतील सर्व मिळून जवळपास १ हजार दिवसांच्या सामन्यांचे आयोजन यशस्वी रित्या करण्यात आले आहे. त्यासाठी रायगड जिल्ह्यातील पंचांनी बहुमूल्य योगदान देऊन चांगले काम केले, त्याबद्दल त्यांनी त्यांचे आभार मानले. तसेच, जिल्ह्यात चांगल्या दर्जाचे क्रिकेट होण्यासाठी आधी चांगल्या दर्जाचे पंच व गुणलेखक तयार होणे गरजेचे आहे. गेल्या दोन वर्षांपासून आरडीसीए तर्फे सातत्याने पंच प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येते आहे. यासाठी हर्षद रावले, राजन कसबे, रुपेश खडगी व नयन कट्टा यांनी अथक परिश्रम घेतले आहेत. परिणामी जिल्ह्यातील १४ पंच एमसीए सर्टिफाईड म्हणून उत्तीर्ण झाले आहेत. भविष्यात जास्तीतजास्त पंच एमसीए सर्टिफाईड पंच व्हावेत, अशी अपेक्षा देखील अनिरुद्ध पाटील यांनी व्यक्त केली आहे.

## युवराज सिंगचा दबदबा संपला

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारत, श्रीलंका आणि अफगाणिस्तान तिरंगी मालिकेच्या अंतिम सामन्यात रविवारी (दि.२१) वैभव सूर्यवंशीने केवळ २९ चेंडूंत ९४ धावांची धडाकेबाज खेळी केली. जरी या १५ वर्षीय खेळाडूचे शतक हुकले असले, तरी त्याने अवघ्या ११ चेंडूंत अर्धशतक झळकावून इतिहास रचला आहे. वैभवने केवळ "लिस्ट-ए" क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात जलद अर्धशतकाचा विक्रमच नोंदवला नाही, तर खेळाच्या सर्व प्रकारांमध्ये भारतासाठी सर्वात जलद अर्धशतक ठोकणाऱ्या खेळाडूंच्या यादीतही आपले स्थान निर्माण केले आहे. प्रथम श्रेणी क्रकेट, 'लिस्ट-ए' क्रिकेट, एकदिवसीय सामने, कसोटी सामने किंवा टी-२० आंतरराष्ट्रीय सामने अशा विविध प्रकारांमध्ये भारतासाठी सर्वात जलद अर्धशतक ठोकणाऱ्यांच्या यादीत आता वैभव सूर्यवंशीच्या नावाचाही समावेश झाला आहे. श्रीलंका 'अ' वरुद्धच्या अंतिम सामन्यात त्याने २९ चेंडूंत ९४ धावांची शानदार खेळी केली. यापूर्वी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारतासाठी सर्वात जलद अर्धशतक करण्याचा विक्रम युवराज सिंगच्या नावावर होता. त्याने २००७ च्या टी-२० विश्वचषकादरम्यान १२ चेंडूंत ही कामगिरी केली होती.

## आयर्लंडविरुद्धच्या मालिकेआधीच भारताला धक्का

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाने नुकतेच घरच्या मैदानावर अफगाणिस्तानला एकदिवसीय मालिकेत ३-० असे पराभूत केले आहे. आता भारत आर्यलंडच्या दौऱ्यावर जाणार आहे. त्यामध्ये दोन सामन्यांची टी-२० मालिका खेळली जाणार असून, त्यासाठी आधीच संघ जाहीर करण्यात आला होता. मात्र, त्यामध्ये आता बदल करण्यात आला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने रविवारी (दि.२१) एक निवेदन जाहीर केले



आहे, त्यामध्ये वरुण चक्रवर्ती दुखापतीमुळे संघाबाहेर झाला असल्याचे सांगितले आहे.

बीसीसीआयने जाहीर केलेल्या निवेदनानुसार, 'आयपीएल २०२६ मध्ये डाव्या पायाला झालेल्या दुखापतीनंतर वरुण चक्रवर्ती बीसीसीआय सीओई येथे त्याच्या पुनर्वसनाच्या अंतिम टप्प्यात आहे. तो आयर्लंडविरुद्धच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतून बाहेर पडला आहे.' तसेच, वरुणच्या बदली खेळाडूची अद्याप मंडळाने घोषणा केलेली नाही. ही मालिका श्रेयस अय्यरच्या टी-२० आंतरराष्ट्रीय कर्णधारपदाची पहिलीच मालिका असणार आहे. त्यातील पहिला सामना दि.२६ जून रोजी आणि दुसरा सामना दि.२८ जून रोजी खेळला जाणार आहे.

## जो रूटने रचला नवा इतिहास

**। लंडन । वृत्तसंस्था ।**

इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील दुसरा सामना सध्या लंडनमधील केनिंग्टन ओव्हल येथे सुरू आहे. सामन्याच्या चौथ्या दिवशी जेव्हा इंग्लंडचा कर्णधार जो रूट फलंदाजीसाठी मैदानात उतरला, तेव्हा त्याने आपल्या डावातील दुसरी धाव घेताच कसोटी क्रिकेटमध्ये १४,००० धावांचा टप्पा गाठला. कसोटी क्रिकेटच्या इतिहासात ही कामगिरी करणारा रूट केवळ दुसरा खेळाडू ठरला आहे; यापूर्वी केवळ भारताचे माजी



खेळाडू सचिन तेंडुलकर यांनाच ही कामगिरी जमली होती.

इंग्लंडचा दिग्गज खेळाडू जो रूट याची कसोटी क्रिकेटमधील फलंदाजीची कामगिरी अत्यंत प्रभावी राहिली असून, त्याने बऱ्याच काळापासून संघासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. रूटने ३०२ डावांत १४,००० धावांचा टप्पा गाठला, त्यामुळे या बाबतीत तो सचिन तेंडुलकरच्या मागे राहिला आहे. सर्वाधिक कसोटी धावांचा (१५,९२१) विक्रम नावावर असलेल्या सचिनने २७९ डावांत १४,००० धावांचा टप्पा गाठला होता, म्हणजेच रूटला तीच कामगिरी करण्यासाठी अतिरिक्त २४ डाव लागले. न्यूझीलंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटीच्या चौथ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा इंग्लंडची स्थिती कठीण होती; ४६३ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना त्यांनी १८२ धावांत पाच गडी गमावले होते, तर रूट ७५ धावांवर नाबाद होता.

## जर्मनी एका तपानंतर बाद फेरीत

**। टोरांटो । प्रतिनिधी ।**

फिफा विश्वचषक दिवसेंदिवस आणखी रोमांचक होत चालला आहे. कॅनडा येथील टोरांटोच्या मैदानावर जर्मनी आणि आयव्हरी कोस्ट यांच्यात हा सामना खेळला गेला. या अतिशय चुरशीच्या सामन्यात जर्मनीने आयव्हरी कोस्टचा २-१ असा पराभव करत थेट बाद फेरीत प्रवेश केला आहे. या विजयासोबतच जर्मनीने तब्बल १२ वर्षांनंतर विश्वचषकाच्या बाद फेरीत स्थान मिळवले आहे.



या सामन्याच्या सुरुवातीला जर्मनीचे नशीब साथ देत नव्हते. पहिल्या हाफमध्ये २३ व्या मिनिटाला अलेक्झांडर पावलोविच आणि ४० व्या मिनिटाला काई हावर्ट्झ यांनी गोल केले होते. मात्र, पंचांनी फाउलमुळे दोन्ही गोल रद्द ठरवले. त्यातच ३० व्या मिनिटाला आयव्हरी कोस्टच्या फ्रँक केसीने शानदार गोल करत आपल्या संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यामुळे पहिल्या हाफअखेर जर्मनीवर दडपण वाढले होते. दुसऱ्या हाफमध्ये जर्मनीने आक्रमक खेळ सुरू केला. संघ १-० ने पिछाडीवर असताना ६० व्या मिनिटाला डेनिज उंडाव मैदानात उतरला आणि त्याने संपूर्ण सामन्याचे चित्रच बदलून टाकले. ६८ व्या मिनिटाला उंडावने अप्रतिम गोल करत जर्मनीला १-१ अशी बरोबरी साधून दिली. त्यानंतर दोन्ही संघांकडून विजयासाठी जोरदार प्रयत्न सुरू होते. सामना बरोबरीत संपणार असे वाटत असतानाच भरपाई वेळेत म्हणजेच ९४ व्या मिनिटाला डेनिज उंडावने आणखी एक गोल करत जर्मनीला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर संपूर्ण स्टेडियममध्ये जर्मनीच्या चाहत्यांनी एकच जल्लोष केला.

## "गंभीरला प्रशिक्षकपदावरून हटवा"

**नवी दिल्ली** : एस श्रीसंत आणि गौतम गंभीर यांच्यातील वाद क्रिकेट जगताला नवा नाही; मात्र, नुकत्याच झालेल्या एका मुलाखतीत श्रीसंतने थेट गंभीरला मुख्य प्रशिक्षकपदावरून हटवण्याची मागणी केल्याने क्रीडा विश्वात खळबळ उडाली आहे. श्रीसंतने ऑन-कॅमेरा संताप व्यक्त करत भारतीय संघाला गंभीरची नव्हे, तर महेंद्रसिंग धोनीसारख्या मार्गदर्शकाची गरज असल्याचे म्हटले आहे. श्रीसंतच्या मते, सध्याच्या भारतीय वरिष्ठ क्रिकेट संघाला तांत्रिक कोचिंगपेक्षा एका चांगल्या मेंटॉरची जास्त गरज आहे. गंभीर खेळाडूंवर विनाकारण दबाव निर्माण करतो, असा आरोप त्याने केला. मुलाखतीत बोलताना श्रीसंत म्हणाला की, "सध्याच्या भारतीय संघात गंभीरचे काय काम आहे? संघाला प्रशिक्षकाची नाही तर एका चांगल्या मार्गदर्शकाची गरज आहे. गंभीरच्या जागी महेंद्रसिंग धोनीला मेंटॉर म्हणून आणले पाहिजे. गंभीरला तातडीने पदावरून हटवून धोनीकडे ही जबाबदारी सोपवावी, असेही तो म्हणाला.

एकदिवसीय मालिकेत निर्विवाद वर्चस्व | नऊ गडी राखत पाजले पराभवाचे पाणी

## भारतीय संघाकडून अफगाणांना व्हाईटवॉश

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाने अफगाणिस्तानला तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत व्हाईटवॉश दिला आहे. शनिवारी (दि.२०) चेन्नईत झालेल्या तिसऱ्या सामन्यात भारताने अफगाणिस्तानला ९ गडी राखून पराभूत केले आहे. भारताच्या विजयात यशस्वी जैस्वाल आणि रोहित शर्मासह प्रसिद्ध कृष्णा यांनी मोलाचा वाटा उचलला. त्यामुळे भारताने या मालिकेत निर्विवाद वर्चस्व ठेवत ३-० ने विजय मिळवला.



या सामन्यात अफगाणिस्तानने कर्णधार हशमतुल्लाह शाहिदीने केलेल्या शतकामुळे भारतासमोर २१९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग भारताने २८.४ षटकात १ गडी गमावत पूर्ण केला. या सामन्यात भारताच्या डावाची सुरुवात बिनबाद ५ धावांपासून सुरू झाली होती. शाहिदी फलंदाजी करताना खेळपट्टीवरून धावल्याने पंचांकडून अफगाणिस्तानला ५ धावांची पेनल्टी आकारण्यात आली. त्यामुळे भारताच्या खात्यात डावाला सुरुवात होण्यापूर्वीच ५ धावा जोडण्यात आले. भारताकडून रोहित शर्मा आणि यशस्वी जैस्वाल यांनी आक्रमक सुरुवात केली होती. यादरम्यान, अफगाणिस्तानने क्षेत्ररक्षणात अनेकदा चूकाही केल्या. त्यामुळे रोहितला जीवदानही मिळाले. रोहित आणि जैस्वाल यांनी अर्धशतके पूर्ण करत दीडशे धावांची भागीदारीही केली. त्यानंतर रोहित शर्मा मोठा शॉट खेळण्याच्या प्रयत्नात झेलबाद झाला. रोहितने ६९ चेंडूत ७९ धावा केल्या. त्यामुळे त्याची आणि जैस्वालची १७० धावांची भागीदारी तुटली. रोहित बाद झाल्यानंतर यशस्वी जैस्वालला श्रेयस अय्यरने साथ दिली. यादरम्यान, जैस्वालने मात्र त्याचे दुसरे एकदिवसीय शतक पूर्ण केले. त्यानंतर त्याने याच षटकात विजयी षटकार ठोकत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. जैस्वाल ८६ चेंडूत ११० धावांवर नाबाद राहिला. श्रेयस अय्यर १९ चेंडूत २० धावांवर नाबाद राहिला.

तत्पुर्वी, अफगाणिस्तानने प्रथम फलंदाजी करताना ४४.२ षटकात सर्वबाद २१८ धावा केल्या. अफगाणिस्तानने रेहमनुल्लाह गुरबाज (५), इब्राहिम झद्रान (११), रेहमत शाह (५) आणि डार्विश रसुली (१) यांचे बळी प्रसिद्ध कृष्णाने घेतल्यानंतर कर्णधार हशमतुल्ला शाहिदी आणि अझमतुल्ला ओमरझाई यांनी १०५ धावांची भागीदारी केली. परंतु, ओमरझाई ५० धावा करून बाद झाला. त्यानंतर मोहम्मद नबीने २१ धावा केल्या. शाहिदीने १०२ धावांनी झुंज दिली. भारताकडून प्रसिद्ध कृष्णाने दमदार गोलंदाजी करताना ५ बळी घेतले, तर गुरनूर ब्रार, प्रिन्स यादव आणि हर्ष दुबे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२१९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)